1. **व्याख्या**

1.1. "खाते/खाती" म्हणजे ॲक्सिस बँकेतील ग्राहकाचे खाते/खाती, जी वेळोवेळी सीआयबी सेवांसाठी परस्पर निर्दिष्ट केली जातात आणि याचा अर्थ ॲक्सिस बँकेतील ग्राहकाचे सर्व विद्‌यमान, नवीन आणि भविष्यातील खाती होय.

1.2. "ग्राहक" किंवा 'क्लायंट' किंवा "कंपनी" म्हणजे या अटी व शर्तींनुसार सीआयबी सेवांचा लाभ घेणारी व्यक्ती / संस्था होय.

1.3. या अटी व शर्तींमध्ये "सीआयबी" किंवा "इंटरनेट बँकिंग सेवा" किंवा "कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग" किंवा "सेवा" यांचा वापर जिथे केला गेला आहे. याचा अर्थ ॲक्सिस बँकेने या अटी व शर्तींनुसार ग्राहकांना देऊ केलेल्या सेवा असा होय. ज्यामध्ये पैसै हस्तांतरण / देयक सेवा (एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएस सुविधा), चेक / डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर सुविधा, वैधानिक आणि कर देयके, व्यापार आणि परकीय चलन सेवा, बिगर-आर्थिक सेवा (धनादेश पुस्तिका, डीडी, पॅन अद्‌ययावत इ.) आणि वेळोवेळी उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही सेवांचा समावेश आहे आणि तसेच यामध्ये ॲक्सिस बँक वेळोवेळी करू शकणाऱ्या अशा सेवांमधील सर्व बदल देखील समाविष्ट आहेत.

1.4. "सूचना" म्हणजे ग्राहकाने ॲक्सिस बँकेला या सेवांच्या अंतर्गत येणाऱ्या क्रियाकलापांसाठी सुरक्षा प्रक्रियेच्या पालन संदर्भातील सर्व संवाद किंवा दिलेल्या सूचना, ज्यामध्ये पैसे पाठविणे किंवा हस्तांतरण करण्यासाठी कोणत्याही देयक सूचनांचा समावेश आहे.

1.5. "ओटीपी" म्हणजे वन-टाइम पासवर्ड/वन-टाइम पर्सनल आयडेंटिफिकेशन नंबर.

1.6. "आरबीआय" म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया होय.

1.7. "एनपीसीआय" म्हणजे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया.

1.8. "विनियम" किंवा "मार्गदर्शक तत्वे" म्हणजे सेवांशी संबंधित आरबीआय, एनपीसीआय किंवा इतर कोणत्याही सरकारी किंवा वैधानिक प्राधिकरणाने वेळोवेळी जारी केलेले सर्व नियम, विनियम आणि/किंवा मार्गदर्शक तत्वे.

1.9. "सुरक्षा प्रक्रिया" म्हणजे सूचनेत सुधारणा करणारी किंवा रद्द करणारी सूचना किंवा घडलेला संवाद ग्राहकाचा आहे की नाही याची प्रक्रिया किंवा पडताळणी करण्याच्या उद्‌देशाने किंवा सूचनेमधील मजकुराच्या प्रसारणात त्रुटी शोधण्यासाठी ॲक्सिस बँकेने वेळोवेळी विहित केलेली अशी प्रक्रिया आहे.

1.10. "अटी आणि शर्ती" म्हणजे येथे नमूद केल्याप्रमाणे, सुधारित आणि पूरक केल्या जाऊ शकणाऱ्या या अटी व शर्ती.

1.11. "वापरकर्ते" म्हणजे ग्राहकाचे प्रतिनिधी ज्यांना सीआयबी द्‌वारे ग्राहकांच्या खात्यांमध्ये संचलन करण्याचे अधिकार आहेत आणि त्यात पाहण्याचे अधिकार असलेले वापरकर्ते आणि इनपुट, अपलोडिंग आणि पडताळणी, पुष्टीकरण आणि/किंवा अधिकृत मंजूरी अधिकार असलेले वापरकर्ते

दोन्ही समाविष्ट असतील. जिथे अशी अधिकृत मंजूरी, अधिकार  ग्राहकाद्वारे संयुक्त आधारावर दिले जातात. तिथे या संज्ञेचा अर्थ संदर्भ किंवा अर्थ आवश्यक असल्यास, अधिकृत मंजूरी अधिकार असलेले संयुक्त वापरकर्ते असा होईल.

1.12. "वेबसाइट / साईट" म्हणजे www.axis.bank.in हे संकेतस्थळ किंवा अ‍ॅक्सिस बँकेने वेळोवेळी सूचित केलेले अन्य संकेतस्थळ होय.

1.13. "जीएसटी" म्हणजे वस्तू किंवा सेवांच्या पुरवठ्यावर किंवा जीएसटी कायद्यांतर्गत दोन्हीवर लादलेला कोणताही कर किंवा उपकर किंवा दोन्ही.

1.14. "जीएसटीआयएन" म्हणजे वस्तू आणि सेवा कर ओळख (आयडेंटिफिकेशन) नंबर.

1.15. "जीएसटीएन" म्हणजे वस्तू आणि सेवा कर जाळे (नेटवर्क).

1.16. जीएसटी कायदे" म्हणजे आयजीएसटी अधिनियम 2017, सीजीएसटी अधिनियम 2017, यूटीजीएसटी अधिनियम 2017 आणि राज्य विशिष्ट एसजीएसटी अधिनियम, 2017 आणि संबंधित कायद्यांतर्गत जारी केलेले सर्व संबंधित नियम, विनियम, अधिसूचना आणि परिपत्रके.

1.17. ग्राहक पुष्टी करतो की DD-MM-YYYY  तारखेचा मंडळाचा ठराव प्रमाणित आणि सत्य आहे. अर्जात नमूद केलेली खाती संचलित करण्यासाठी वापरकर्त्यांना अधिकृत करण्याचा अधिकार ग्राहकाला मंडळाच्या ठरावाद्वारे (किंवा समतुल्य) देण्यात आला आहे.

1.18. ग्राहक पुष्टी करतो की, अर्जात नमूद केलेले तपशील अचूक आहेत. प्रदान केलेला  ईमेल आयडी अधिकृत आहे.

1.19. (वापरकर्त्यांचा ईमेल आयडी खाजगी डोमेन नसल्यास लागू) ग्राहक पुष्टी करतो की त्यांच्याकडे खाजगी डोमेन असलेले ईमेल आयडी नाहीत आणि कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंगमधील वापरकर्त्यांसाठी नमूद केलेले ईमेल आयडी सार्वजनिक डोमेनमध्ये आहेत. वापरकर्त्यांसाठी सार्वजनिक डोमेन आयडी वापरल्यामुळे निधीचे नुकसान होऊ शकते अशा कोणत्याही तडजोड, हॅकिंग, चोरी, सायबर-गुन्हेगारी सह परंतु त्यापुरते मर्यादित नसलेल्या कोणत्याही आणि सर्व जोखमींपासून ग्राहक बँकेला हानी रहित ठेवेल आणि नुकसान भरपाई देईल.

1.20. ग्राहकांना ज्ञात आहे आहे की, कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंगची सुविधा केवळ ग्राहकाच्या/ग्राहकांच्या विनंती प्रमाणेच दिली जाते. बँक कोणत्याही प्रकारच्या हॅकिंग आणि/किंवा फिशिंग हल्ल्यांसाठी आणि/किंवा सायबर संबंधित गुन्ह्यांसाठी जबाबदार राहणार नाही. जे सुविधेच्या प्रलंबित कालावधीत खात्यामध्ये घडू शकतात किंवा होऊ शकतात आणि ज्यामुळे ग्राहकांच्या खात्यातून तृतीय पक्षाच्या खात्यात निधी हस्तांतरित केल्यामुळे नुकसान होऊ शकते. ग्राहकांना हे देखील माहित आहे की बँकेने सर्व आवश्यक खबरदारी घेतली असली तरी, तृतीय पक्षांकडून अशा हल्ल्यांची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणात कोणत्याही परिस्थितीत बँक आमच्याकडून अशा कोणत्याही दाव्यांपासून मुक्त असेल.

1.21. ग्राहक मान्य करतो की, उपरोक्त उल्लेखित वापरकर्त्यांसाठी दिलेला ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर वैध आहेत. बँकेकडून कोणत्याही/सर्व संपर्कासाठी वापरला जाईल. हे संवाद व्यवहार/माहिती/ॲक्सेस/जागरूकता यांच्याशी संबंधित असू शकतात. जे बँकेकडून वेळोवेळी पाठवले जाऊ शकतात.

## 2. अटींची अंमलबजावणी

2.1 सीआयबी सेवांचा वापर या अटी व शर्तींद्वारे नियंत्रित केला जातो. या अटी व शर्ती ॲक्सिस बँकद्वारे विहित केल्याप्रमाणे ग्राहकाला लागू असलेल्या इतर कोणत्याही अटी व शर्तींव्यतिरिक्त आहेत आणि त्या रद्दबातल नाहीत.

2.2 ॲक्सिस बँक तक्रार निवारण पॉलिसी अटी व शर्ती

2.3 ॲक्सिस बँक वचनबद्धता संहिता अटी व शर्ती

2.4 प्रॉडक्ट तपशील आणि ग्राहक सपोर्टच्या बाबतीत आमच्याशी संपर्क साधा

2.5 ग्राहक भरपाई पॉलिसी

## 3. सेवा

3.1 या अटी व शर्तींच्या अधीन, लागू कायदे आणि ॲक्सिस बँकच्या वेबसाईटवर नमूद केलेल्या इतर अटी व शर्तींच्या अधीन राहून, ॲक्सिस बँक ग्राहकांना सेवा प्रदान करेल. ॲक्सिस बँकेला वेळोवेळी सेवांमध्ये किंवा सेवांच्या पद्धती आणि व्याप्तीमध्ये बदल, सुधारणा आणि/किंवा निलंबन करण्याचा अधिकार असेल आणि सेवांमधील अशा बदलाची माहिती ग्राहकांना देण्याचा प्रयत्न करेल. ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता आणि त्यामुळे कोणतेही कारण न देता त्यांना प्रदान केलेल्या सर्व किंवा कोणत्याही सेवा निलंबित करण्याचा अधिकार बँककडे राखीव आहेत.

3.2 सेवांचा किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचा लाभ घेण्यासाठी किंवा त्यांचा लाभ घेणे बंद करण्यासाठी, ग्राहकाने विहित नमुन्यात ॲक्सिस बँकेकडे स्वतंत्र अर्ज करावा आणि ग्राहक या उद्देशासाठी ॲक्सिस बँकेने विहित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्तींद्वारे नियंत्रित असेल, तसेच लागू कायद्यांच्या अधीन असेल.

3.3 ग्राहकाच्या विनंतीनुसार, ॲक्सिस बँक इतर कोणत्याही विद्यमान/नवीन खात्यांना सेवा देऊ शकते आणि ग्राहकाद्वारे सेवांच्या पुढील वापरावर हे नियम व अटी आपोआप लागू होतील.

3.4 ग्राहक याद्वारे स्वीकार करतो आणि मान्य करतो की, सेवांमध्ये समाविष्ट असलेले आणि बँकने सेवांच्या तरतुदीदरम्यान विकसित/निर्मित केलेले बौद्धिक संपदा अधिकार, पूर्णपणे बँकेच्या मालकीचे

असतील आणि बँकेकडे निहित राहतील आणि या अटी व शर्ती कोणत्याही प्रकारे ग्राहकांना बौद्धिक संपदा अधिकारांच्या मालकीचा किंवा वापराचा कोणताही अधिकार देत नाही

3.5 जर ग्राहकाने/वापरकर्त्याने नोंदणीकृत वापरकर्ता आयडीद्वारे इंटरनेट बँकिंग सेवा ॲक्सेस करण्यासाठी नियुक्त केलेल्या प्लॅटफॉर्मवरून अखेरचे लॉग-इन केल्याच्या तारखेपासून 365 (तीनशे पासष्ट) [कॅलेंडर दिवस] सतत नोंदणीकृत वापरकर्ता आयडीद्वारे कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंगमध्ये लॉग-इन केले नसल्यास, ॲक्सिस बँक कोणत्याही ग्राहकाला/वापरकर्त्याला/वापरकर्त्याच्या आयडीला "निष्क्रिय वापरकर्ता" म्हणून वर्गीकृत/चिन्हांकित/वर्गीकरण करू शकते. कोणत्याही ग्राहक/वापरकर्ता/वापरकर्ता आयडीचे 'निष्क्रिय वापरकर्ता' म्हणून वर्गीकृत/चिन्हांकित/वर्गीकरण केल्यानुसार, असा ग्राहक/वापरकर्ता कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंगमध्ये अशा निष्क्रिय वापरकर्ता आयडीला पुन्हा सक्रिय केल्याशिवाय संबंधित नोंदणीकृत वापरकर्ता आयडीवरून कोणत्याही कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग सेवा प्राप्त करू शकणार नाही. निष्क्रिय वापरकर्ता आयडी पुन्हा सक्रिय करण्यासाठी, संबंधित ग्राहक (अधिकृत स्वाक्षरीकर्त्याद्वारे) / वापरकर्ता ॲक्सिस बँकेला लेखी सूचना देऊ शकतो, ज्यामध्ये निष्क्रिय वापरकर्ता आयडी पुन्हा सक्रिय करण्याची विनंती केली जाऊ शकते आणि पुन्हा सक्रिय करण्याची विनंती प्राप्त झाल्यानंतर, ॲक्सिस बँक, तिच्या विवेकबुद्धीनुसार, पुन्हा सक्रिय करण्याची अशी विनंती मंजूर करू शकते आणि वापरकर्ता आयडी पुन्हा सक्रिय करून ग्राहकाला / वापरकर्त्याला पुन्हा ॲक्सेस देऊ शकते.

3.6 ग्राहक याद्वारे बँकेला एकल (सिंगल) पेमेंटसाठी प्रदान केलेल्या प्रमाणीकरण मॅट्रिक्सच्या आधारे विद्यमान ग्राहकांना डिफॉल्ट म्हणून बल्क पेमेंट आणि टीएफ कनेक्टच्या सेवांचा विस्तार करण्यास अधिकृत करतो. लागू असलेल्या अटी व शर्ती ग्राहकाद्वारे अशा पुढील सेवांच्या वापरासाठी लागू होतील.

3.7 ॲक्सिस बँक लिमिटेड (ॲक्सिस-बी) कोणतीही हमी देत नाही किंवा वॉरंटी देत नाही आणि ॲक्सिस-बी देयक हस्तांतरण सुविधा (एनईएफटी, आरटीजीएस आणि आयएमपीएस) सोबत संलग्न कोणत्याही उत्कृष्ट गुणवत्तेविषयी कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. निकषांची पूर्तता केल्यास ते काम करेल या गृहीतकावर चांगल्या विश्वासाने पैसे हस्तांतरण  करण्यासाठी ॲक्सिस-बी द्वारे ही सुविधा प्रदान केली आहे. नुकसान प्रत्यक्ष असो, अप्रत्यक्ष असो, प्रासंगिक असो किंवा आनुषंगिक असो आणि कोणताही दावा महसूल नुकसानीच्या आधारे केलेला असला तरीही, ग्राहकांनी केलेला व ॲक्सिस-बी द्वारे प्रक्रिया केलेला कोणताही व्यवहार अयशस्वी झाल्यामुळे,  ग्राहकांच्या खात्यांबाबत किंवा कोणत्याही प्रकारच्या किंवा स्वरुपाच्या नुकसानीबाबत ॲक्सिस-बी द्वारे  दिलेल्या किंवा उघड केलेल्या माहितीमुळे, आणि ग्राहकाद्वारे किंवा कोणत्याही इतर व्यक्तीद्वारे राखली गेल्यामुळे कामकाजात अडथळा आला तरीही, ॲक्सिस-बी कोणत्याही नुकसानीसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही, याच्याशी ग्राहक सहमत आहे आणि मान्य करतो.

तथापि, ग्राहकाने प्रस्तावित केल्याप्रमाणे व्यवहार त्वरित अंमलात आणण्याचा आणि त्यावर प्रक्रिया

करण्याचा ॲक्सिस-बी प्रयत्न करेल. परंतु यंत्रणा कार्यप्रणालीत बिघाडामुळे किंवा कायद्याच्या कोणत्याही आवश्यकतेसह कोणत्याही कारणास्तव प्रतिसाद न मिळाल्यास किंवा प्रतिसाद देण्यास विलंब झाल्यास जबाबदार असणार नाही.

वरील असूनही, ॲक्सिस-बी ट्रान्सफर सुविधेचा (एनईएफटी, आरटीजीएस आणि आयएमपीएस) बेकायदेशीर किंवा अयोग्य वापर केल्याने ग्राहकाला ॲक्सिस-बी त्याच्या विवेकबुद्धीनुसार ठरवू शकेल असे आर्थिक शुल्क किंवा दंड भरण्यास जबाबदार धरेल किंवा परिणामी ॲक्सिस-बी देयक हस्तांतरण सुविधा (एनईएफटी, आरटीजीएस आणि आयएमपीएस) निलंबित केली जाऊ शकते. ग्राहक याद्वारे ॲक्सिस-बी आणि त्याच्या सहाय्यक कंपन्या आणि संलग्न संस्थांना कोणत्याही खटल्यापासून, त्याच्याविरुद्ध सुरू केलेल्या कार्यवाही पासून किंवा त्यामुळे झालेल्या कोणत्याही नुकसानापासून, खर्चापासून किंवा हानीपासून पूर्णपणे नुकसानभरपाई देण्यास आणि हानीरहित ठेवण्यास सहमत आहे.

ॲक्सिस-बी देयक हस्तांतरण सुविधा (एनईएफटी, आरटीजीएस आणि आयएमपीएस) वापरून कोणत्याही अनधिकृत व्यक्तींनी फिशिंग आणि/किंवा हॅकिंगसह कोणत्याही माध्यमातून रेकॉर्ड आणि/किंवा खाते/माहिती ॲक्सेस केल्यास ॲक्सिस-बी  किंवा त्याच्या उपकंपन्या किंवा सहयोगी कंपन्या जबाबदार राहणार नाहीत आणि ग्राहक याद्वारे ॲक्सिस-बी आणि त्याच्या उपकंपन्या आणि सहयोगी कंपन्यांना त्यांच्याविरुद्ध सुरू केलेल्या कोणत्याही कारवाई, खटला, कार्यवाही किंवा त्यामुळे झालेल्या कोणत्याही नुकसान, खर्च किंवा हानीपासून पूर्णपणे हानिरक्षित करतो आणि त्यांना हानीरहित ठेवतो. जर एखाद्या दुर्घटनेमुळे किंवा ॲक्सिस-बी नियंत्रणाबाहेरील इतर कोणत्याही कारणास्तव ॲक्सिस-बी देयक हस्तांतरण सुविधा (एनईएफटी, आरटीजीएस आणि आयएमपीएस) इच्छित पद्धतीने उपलब्ध नसल्यास ॲक्सिस बँक कोणत्याही परिस्थितीत ग्राहकासाठी जबाबदार राहणार नाही.

ॲक्सिसबी पेमेंट ट्रान्सफर सुविधा (एनईएफटी, आरटीजीएस आणि आयएमपीएस) च्या वापरामुळे उद्भवणाऱ्या व्यवहारांद्वारे तयार केलेले ॲक्सिस-बीचे सर्व रेकॉर्ड (इलेक्ट्रॉनिक सह), ज्यामध्ये व्यवहाराची नोंद केलेली वेळ देखील समाविष्ट आहे, ते व्यवहाराच्या वास्तविकता आणि अचूकतेचा निर्णायक पुरावा असतील. दोन्ही पक्षांच्या संरक्षणासाठी आणि गैरसमज दूर करण्यासाठी एक साधन म्हणून, ग्राहक ॲक्सिस-बीला, त्याच्या विवेकबुद्धीनुसार, आणि ग्राहकांना पुढील पूर्वसूचना न देता, ग्राहक आणि ॲक्सिस-बी आणि त्यांच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांमध्ये किंवा एजंटमध्ये किंवा ग्राहकाने ॲक्सिस-बीला दिलेल्या सूचनांमधील कोणत्याही किंवा सर्व टेलिफोन संभाषणांचे (जर असल्यास) निरीक्षण आणि रेकॉर्डिंग करण्यास सहमती देतो आणि अधिकृत करतो.

ॲक्सिस-बी कोणत्याही प्रकारची सर्व हमी स्पष्टपणे नाकारते, मग ती स्पष्ट असो किंवा निहित असो किंवा वैधानिक असो, ज्यामध्ये व्यापारक्षमतेची निहित हमी, विशिष्ट उद्देशासाठी योग्यता, डाटा

अचूकता आणि पूर्णता आणि ॲक्सिस-बी देयक हस्तांतरण सुविधेमध्ये (एनईएफटी, आरटीजीएस आणि आयएमपीएस) गैर-उल्लंघनाशी संबंधित कोणत्याही हमीचा समावेश होतो परंतु त्यापुरते मर्यादित नाही.

## 4. अटी व शर्तींमध्ये सुधारणा

4.1. या अटी व शर्तींमध्ये इतरत्र काहीही असले तरी, जेव्हा ॲक्सिस बँक सेवांमध्ये श्रेणीसुधार किंवा सुधारणा करण्याचा किंवा ग्राहकांना नवीन सेवा प्रदान करण्याचा निर्णय घेते, तेव्हा असे श्रेणीसुधार, सुधारणा आणि नवीन सेवा ॲक्सिस बँकेने निश्चित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन असतील. ॲक्सिस बँक यापैकी कोणत्याही अटी व शर्तींमध्ये कोणत्याही वेळी, अशी सुधारणा आवश्यक असल्यास सुधारणा करेल किंवा पूरक करेल अशी सुधारणा ग्राहकांवर बंधनकारक असेल. ॲक्सिस बँक ग्राहकांना अशा बदलांची माहिती देण्याचा प्रयत्न करेल. या अटी व शर्तींमधील कोणताही बदल ग्राहकांसाठी संकेतस्थळ/संकेतस्थळ अद्ययावत/अपलोड केला जाईल, तो ग्राहकांना सूचित केला गेला आहे असे मानले जाईल.

## 5. सुरक्षा प्रक्रिया

5.1. ग्राहक, स्वतःच्या जोखमीवर आणि परिणामांनुसार ॲक्सिस बँकेने वेळोवेळी विहित केलेल्या सुरक्षा प्रक्रियेचे पालन करून सेवा प्राप्त करेल, ज्यामध्ये (i) वापरकर्ता-आयडी आणि पासवर्ड (ii) कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग सेवा प्राप्त करण्यासाठी वन-टच उपकरणांचा वापर समाविष्ट आहे. याव्यतिरिक्त, ॲक्सिस बँक ग्राहकांना ॲक्सिस बँकेला आवश्यक असल्याप्रमाणे अशा इतर सुरक्षा प्रक्रिया आणि प्रमाणीकरणाच्या पद्धतींचा अवलंब करण्याचा सल्ला देऊ शकते आणि ग्राहक अशा सुरक्षा प्रक्रियेचे पालन करण्यास सहमत आहे.

5.2. ग्राहकाने आणि ग्राहकाने अधिकृत केलेल्या वापरकर्त्यांनी, सर्व युजर आयडी आणि पासवर्ड, ओटीपी, पासवर्डसह, गोपनीय आणि चांगल्या प्रकारे संरक्षित ठेवावेत आणि ते ॲक्सिस बँकेचे कर्मचारी आणि प्रतिनिधी, विक्रेते, भागीदार यांच्यासह कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला उघड करू नयेत. ग्राहकाने किंवा वापरकर्त्याने कोणत्याही तृतीय पक्षाला पासवर्ड उघड केल्यामुळे ग्राहकाचे कोणतेही नुकसान झाल्यास, ॲक्सिस बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

5.3. ग्राहकांना कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग चॅनेलचा बँकेने प्रदान केलेल्या अनिवार्य 2 फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA) द्वारे प्रवेश दिला जाईल. ॲक्सिस बँक वेळोवेळी त्यांच्या उत्पादन उपलब्धतेचा भाग म्हणून एसएमएस, ऑन कॉल, मोबाईलवर ओटीपी, वन टच डिव्हाइसेस किंवा अशा कोणत्याही मार्गांनी 2एफए प्रदान करू शकते.

- ॲक्सिस मोबाईल-कॉर्पोरेट ॲपवर ओटीपी निर्माण करुन ग्राहक वेब ब्राउझरवर लॉग-इन करू शकतात किंवा व्यवहारांना मान्यता मिळवू शकता. जर वापरकर्त्याने ॲक्सिस मोबाईल-कॉर्पोरेट ॲप्लिकेशन वर एम-पिन रजिस्टर केला असेल आणि सेट-अप केला असेल तर मोबाईल ॲपवर ओटीपी भारतात किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण केला जाऊ शकतो.
- ग्राहकाच्या मोबाईल फोन नेटवर्क मधील कोणत्याही समस्येमुळे किंवा ग्राहकाच्या मोबाईल फोन किंवा सिम कार्डमधील अन्य कोणत्याही समस्येमुळे व्यवहार अयशस्वी झाल्यास, ज्यावर बँकेचे कोणतेही नियंत्रण नाही. त्यासाठी बँक जबाबदार राहणार नाही.
- ग्राहकाचे मोबाईल फोन आणि/किंवा सिम कार्ड हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास, ग्राहकाने त्यांच्या सेवा प्रदात्याकडे त्यांचा मोबाईल फोन आणि/किंवा सिम कार्ड तात्काळ रद्द करणे किंवा ब्लॉक करणे आवश्यक आहे. ग्राहकाने अशा नुकसानाची किंवा चोरीची माहिती ताबडतोब बँकेला द्यावी, त्यानंतर बँक कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंगमधील वापरकर्ता ॲक्सेस त्वरित निष्क्रिय करेल. कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंगमध्ये ॲक्सेस सक्रिय करण्यासाठी वापरकर्त्याला लेखी किंवा प्रमाणित प्रक्रियेद्वारे बँकेला सूचित करणे आवश्यक आहे. अशा हरवलेल्या किंवा चोरीला गेलेल्या कारणामुळे मोबाईल फोन किंवा सिम कार्डचा कोणताही अनधिकृत वापर झाल्यास बँक जबाबदार राहणार नाही. ग्राहकाने मोबाईल फोन आणि त्यातील डाटा, पासवर्ड आणि त्याचा वापर गोपनीय ठेवणे आवश्यक आहे आणि कोणत्याही परिस्थितीत तो इतर कोणाशीही शेअर केला जाणार नाही हे सुनिश्चित करावे. बँकेने परवानगी दिलेल्या किंवा आवश्यक असलेल्या वापराच्या उद्देशाशिवाय, ग्राहकाने मोबाईल फोनमध्ये डाटाची कॉपी किंवा डुप्लिकेट तयार करू नये किंवा असा डाटा सेव्ह करू नये.
- ग्राहकांनी हे सुनिश्चित करावे की प्रत्येक वापरकर्ता त्याच्या 2FAच्या सुरक्षिततेसाठी जबाबदार असेल.

5.4. इंटरनेट बँकिंग चॅनेलमध्ये व्यवहार आणि विनंत्या ॲक्सेस करताना किंवा मंजूर करताना ग्राहकांना हे 2 एफए वापरणे अनिवार्य असेल.

5.5. वापरकर्ता त्यांचे मोबाईल उपकरण  किंवा वन टच उपकरण (ज्याला हार्ड टोकन असेही म्हणतात) यांच्या सुरक्षेसाठी जबाबदार असतील आणि 2 एफए वापरून संस्थेच्या सदस्यांनी दिलेल्या कोणत्याही आणि सर्व सूचना आणि/किंवा व्यवहारांना बांधील असतील. ॲक्सिस बँक सुरक्षा प्रक्रियेचा वापर करून दिलेल्या सर्व सूचना प्रमाणित, सत्य म्हणून गृहित धरण्यास पात्र असेल.

5.6. वापरकर्त्याच्या इंटरनेट बँकिंग ॲक्सेसचा गैरवापर प्रतिबंधित करण्यासाठी आवश्यक प्रतिबंधाकरिता 2 एफए ची तडजोड होऊ शकणाऱ्या मोबाईल उपकरणाचे कोणतेही नुकसान किंवा चोरी किंवा गहाळ होणे किंवा हानी बँकेला त्वरित कळविणे आवश्यक आहे.

5.7. ॲक्सिस बँक वेळोवेळी उद्योग क्षेत्रात उपलब्ध असलेल्या योग्य सुरक्षा उपाययोजनांचा अवलंब करण्याचा प्रयत्न करेल. तथापि, ग्राहक मान्य करतो की इंटरनेटसह वापरलेले तंत्रज्ञान तसेच

सार्वजनिक/सामायिक सुविधांचा वापर अनेक जोखीमांसाठी संवेदनशील आहे. जसे की गैरवापर, हॅकिंग, व्हायरस, विद्वेशपूर्ण, विध्वंसक किंवा करप्टिंग कोड, प्रोग्राम किंवा मॅक्रो जे सेवांवर परिणाम करू शकतात. अशा जोखमींमुळे सूचनांच्या प्रक्रियेतील कोणतेही नुकसान, विलंब किंवा अयशस्वी झाल्यास, रिपोर्टिंग आणि/किंवा पावती निर्माण करण्यासाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही.

5.8. ॲक्सिस बँकेच्या सुरक्षा धोरणानुसार ग्राहकाने दर 90 दिवसांनी कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मवर त्याचा पासवर्ड अद्ययावत करावा. यासाठी, वापरकर्त्यांना लॉग-इन वेळी 85 व्या दिवसापासून ते 90 व्या दिवसापर्यंत त्यांचा लॉग-इन पासवर्ड बदलण्यासाठी पूर्व-सूचित केले जाईल.

- लॉग इन करणे सुरू ठेवण्यासाठी वापरकर्त्यांना 91 व्या दिवसापासून ते 180 व्या दिवसाच्या दरम्यान पासवर्ड अनिवार्यपणे रिसेट करणे आवश्यक आहे.
- जर वापरकर्त्यांनी 180 दिवसांपर्यंत पासवर्ड बदलला नाही, तर लॉग-इन ॲक्सेस तात्पुरता निष्क्रिय केला जाईल. कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग सेवा पुन्हा सक्रिय करण्यासाठी ग्राहकांना आरएम/शाखेशी संपर्क साधावा लागेल.

## 6. सूचना

6.1. ॲक्सिस बँकेला ग्राहकांकडून मिळालेल्या सर्व सूचनांवर फक्त कामकाजाच्या दिवसांमध्ये बँकिंग वेळेतच प्रक्रिया केली जाईल. या अटी व शर्तींमध्ये नमूद केलेल्या पद्धतीने, येथे नमूद केलेल्या सुरक्षा प्रक्रियेचा वापर करून, जर सूचना ॲक्सिस बँकेला पाठवली गेली असेल तरच ॲक्सिस बँकेकडून ती स्वीकारली जाईल. ॲक्सिस बँक, तिच्या पूर्ण विवेकबुद्धीनुसार परंतु कोणत्याही बंधनाशिवाय, सूचनांच्या सत्यतेबद्दल पुढील तपासणी करू शकते.

6.2. ॲक्सिस बँकेला दिलेल्या सूचनांच्या अचूकतेची आणि सत्यतेची पूर्णपणे जबाबदारी ग्राहकाची आहे आणि त्यांनी अधिकृत केलेल्या कोणत्याही वापरकर्त्याने दिलेल्या कोणत्याही आणि सर्व सूचना आणि/किंवा केलेल्या व्यवहारांना तो बांधील असेल. ॲक्सिस बँकेला ग्राहकाने दिलेल्या सर्व सूचनांवर अवलंबून राहण्याचा आणि अशा सूचनांवर कार्य करण्याचा अधिकार असेल. ग्राहक मान्य करतो आणि सहमत आहे की कोणत्याही माहिती आणि/किंवा सूचनांमध्ये कोणतीही चूक आढळल्यास, परिणामी चुकीचे हस्तांतरण होऊ शकते. अशा सर्व सूचना अंतिम असतील आणि ग्राहकावर बंधनकारक असतील. ॲक्सिस बँकेला दिलेल्या प्रत्यक्ष सूचनांवर कोणतेही विवाद असल्यास, ॲक्सिस बँकेचे रेकॉर्ड अंतिम असतील आणि ग्राहकावर बंधनकारक असतील.

6.3. ग्राहकाच्या पुढील सूचनांद्वारे रद्द केली जात नाही किंवा ॲक्सिस बँकेद्वारे अंमलात आणली जात नाही तोपर्यंत सूचना प्रभावी राहील. ग्राहकाला ॲक्सिस बँकेला पुरविलेल्या कोणत्याही

माहितीमध्ये त्रुटी आढळल्यास, ती त्वरित ॲक्सिस बँकेला सूचित करावी आणि ॲक्सिस बँक "वाजवी प्रयत्नांच्या" आधारावर जिथे शक्य असेल तिथे त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करेल. इतर कोणत्याही व्यक्तीने केलेल्या चुकीमुळे ग्राहकाच्या खात्यात चुकून पैसे क्रेडिट झाल्यास, ग्राहक कोणत्याही वेळी चुकीने क्रेडिट झालेले रिव्हर्स करण्यासाठी ॲक्सिस बँकेला अधिकृत करतो. ग्राहकाला ॲक्सिस बँकेकडून मिळालेल्या कोणत्याही अनुचित किंवा अन्याय्य नफ्यासाठी तो जबाबदार असेल आणि तो यापुढेही जबाबदार राहील.

6.4. जर ॲक्सिस बँकेचे असे मत असेल की (i) तिला मिळालेली सूचना ग्राहकाने योग्यरित्या अधिकृत केलेली नसेल तर; किंवा (ii) कोणत्याही कायद्याच्या किंवा धोरणाच्या विरुद्ध परस्परविरोधी, विसंगत, अस्पष्ट, अपूर्ण, कमतरतापूर्ण आहे, किंवा (iii) ॲक्सिस बँकेला असे मानण्याचे कारण आहे की ही सूचना बेकायदेशीर व्यवहार करण्यासाठी जारी केला गेली आहे; किंवा (iv) सूचना कोणत्याही विशेष परिस्थितीच्या नोटीस सोबत जोडली गेली आहे, (v) खात्यात पुरेसे फंड्स नाही किंवा क्लिअर फंड्सची उपलब्धता नाही; ॲक्सिस बँक, (तसे करण्यास बांधील नसताना) अशा कोणत्याही सूचनांवर किंवा कृतीवर कारवाई करण्यापूर्वी ग्राहकाकडून स्पष्टीकरण मागू शकते किंवा तिला योग्य वाटेल त्या पद्धतीने अशा कोणत्याही सूचनांवर कारवाई करू शकते किंवा करण्यास नकार देऊ शकते. वरील परिस्थितीत कोणत्याही सूचना पूर्ण करण्यास किंवा अंमलात आणण्यास नकार देण्यामुळे किंवा कोणत्याही सूचना लागू करण्यात झालेल्या  विलंबामुळे ग्राहकाला किंवा कोणत्याही तृतीय पक्षाला झालेल्या कोणत्याही नुकसानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.

6.5. आपल्या वाजवी नियंत्रणाबाहेरच्या कोणत्याही परिस्थितीमुळे किंवा कायद्याच्या कोणत्याही आवश्यकतांमुळे किंवा कोणत्याही तृतीय पक्ष, विक्रेता आणि/किंवा भागीदाराने केलेल्या कोणत्याही कमतरतेमुळे, कोणत्याही कारणास्तव सूचना अंमलात आणण्यात येणाऱ्या कोणत्याही विलंबासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

6.6. जर आवश्यक कागदपत्रांमुळे प्रभावित होत नसेल तर कोणत्याही सूचना लागू करणे शक्य नसेल, तर ॲक्सिस बँकेला अशी कागदपत्रे प्राप्त होईपर्यंत अशा सूचनांवर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

6.7. निधीच्या कमतरतेमुळे आणि/किंवा कोणत्याही सरकारी संस्थेकडून किंवा वैधानिक प्राधिकरणाकडून मिळालेला कोणताही आदेश, मार्गदर्शक तत्वे किंवा निर्देश यामुळे सूचनांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

6.8. ग्राहकाने दिलेल्या सूचनांनुसार कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग चॅनेलमध्ये व्यवहार प्रक्रिया नियम आणि मर्यादा तयार केल्या जातील. इंटरनेट बँकिंगवर व्यवहार सुरू करण्याची आणि मंजूर करण्याची जबाबदारी ग्राहकाची आहे आणि सुविधेचा गैरवापर/अनधिकृत वापर किंवा वापरकर्त्यांकडून ॲक्सेस

क्रेडेन्शियल्सशी तडजोड झाल्यामुळे उद्भवलेल्या कोणत्याही अनपेक्षित परिणामांसाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

6.9. ग्राहकाने केलेल्या कोणत्याही विदेशी चलन व्यवहाराशी संबंधित कोणत्याही सूचनेच्या बाबतीत, ॲक्सिस बँकद्वारे निर्दिष्ट केलेले विनिमय दर, जर असल्यास (त्याच्या संकेतस्थळा द्वारे किंवा अन्यथा) केवळ तात्पुरते असतील आणि भविष्यातील विनिमय दरातील बदलांच्या अधीन असतील. ज्या दराने व्यवहार प्रभावी केला जातो तो सर्व हेतू आणि उद्देशांसाठी प्रभावी दर असेल. ग्राहकाने दिलेल्या कोणत्याही सूचनांमुळे, नियम, विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, 1999, अंतर्गत तयार केलेले विविध नियम आणि भारतीय रिझर्व्ह बँक किंवा इतर कोणत्याही सरकारी संस्थेने किंवा वैधानिक प्राधिकरणाने घालून दिलेल्या इतर नियम आणि विनियम यांसह, कोणत्याही मर्यादेशिवाय, लागू कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन होऊ नये.

**7. इंटरनेट बँकिंग सेवांसाठी ॲक्सिस बँकेचे अधिकार**

7.1 ग्राहकाद्वारे सूचना देऊन, ॲक्सिस बँकेला सेवांसाठी नोंदणीकृत असलेल्या सर्व खात्यांमध्ये ॲक्सेस करण्यासाठी, इंटरनेट बँकिंग सेवांद्वारे ग्राहकाने केलेले बँकिंग किंवा इतर व्यवहार करण्यासाठी अपरिवर्तनीय आणि बिनशर्त अधिकृत केले जाते.

**8. व्यवहार मर्यादा**

8.1. ॲक्सिस बँक वेळोवेळी त्यांच्या विविध सेवांसाठी कमाल आणि किमान व्यवहार मर्यादा निर्दिष्ट करू शकते. ॲक्सिस  बँकेने लादलेल्या अशा मर्यादांचे पालन करण्यास ग्राहक बांधील असेल.

**9. माहितीमधील बदल**

9.1. ग्राहकाने दिलेल्या माहितीत किंवा कागदपत्रांमध्ये कोणतेही बदल झाल्यास, ग्राहकाने ॲक्सिस बँकेने ठरवून दिलेल्या पद्धतीने बदलाच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत ॲक्सिस बँकेला ग्राहकाच्या निराकरणासह  कळवावे. ग्राहकला वेळोवेळी ॲक्सिस बँकेला या संदर्भात पत्र देऊन, ग्राहकांच्या निराकरणासह, वापरकर्त्यांची यादी सुधारित करण्याचा, जोडण्याचा आणि/किंवा हटवण्याचा अधिकार असेल. ॲक्सिस बँकेने बदलांच्या अंमलबजावणीची सूचना ग्राहकांना दिल्यानंतरच असा कोणताही बदल प्रभावी होईल आणि तोपर्यंत ॲक्सिस बँक ॲक्सिस बँकेकडे उपलब्ध असलेल्या वापरकर्त्यांच्या यादीत ज्या ग्राहकांची नावे नमूद केली आहेत त्यांच्या कोणत्याही प्रतिनिधींकडून मिळालेल्या सूचना स्वीकारत राहील आणि त्यांचे पालन करत राहील.

**10. गोपनीयता आणि प्रकटीकरण**

10.1. ग्राहक याद्वारे ॲक्सिस बँकेद्वारे ग्राहकाची गोपनीय माहिती वापरण्यास आणि ॲक्सिस बँकेद्वारे ग्राहकाशी संबंधित कोणतीही माहिती शाखा, सहाय्यक, प्रतिनिधी कार्यालये, संलग्न, लेखापरीक्षक, विक्रेते, भागीदार आणि एजंट्स यांना आणि त्यांच्या दरम्यान हस्तांतरित करण्यास अधिकृत करतो आणि अशी कोणतीही शाखा, सहाय्यक, प्रतिनिधी कार्यालय, संलग्न, विक्रेता, भागीदार किंवा एजंट कोणत्याही कायदा, न्यायालय, नियामक किंवा कायदेशीर प्रक्रियेद्वारे आवश्यक असलेली कोणतीही माहिती हस्तांतरित करण्यास पात्र असेल.

**11. हमीपत्रांचे अस्वीकरण**

11. 1 येथे हमी दिल्याप्रमाणे आणि अटी व शर्ती वगळता, ॲक्सिस बँक येथे प्रदान केलेल्या सेवांबाबत इतर कोणतीही स्पष्ट किंवा निहित हमी देत नाही आणि याद्वारे कोणत्याही प्रकारच्या सर्व हमी स्पष्टपणे नाकारते, मग त्या स्पष्ट असो किंवा निहित असो किंवा वैधानिक असो, ज्यामध्ये सीआयबी प्रणाली/सेवांचे अखंड, त्रुटी-मुक्त, वेळेवर किंवा सुरक्षित कामगिरी, शीर्षक, समाधानकारक गुणवत्ता, व्यापारक्षमता, विशिष्ट उद्देशासाठी योग्यता, डाटा अचूकता आणि पूर्णता आणि इंटरनेट बँकिंगमध्ये उल्लंघन न करण्याशी संबंधित कोणत्याही हमी किंवा ॲक्सिस बँकेकडून ग्राहकांना माहितीचे व्हायरसमुक्त प्रसारण यांचा समावेश आहे परंतु त्यापुरते मर्यादित नाही.

**12. सेट-ऑफचा अधिकार**

12.1. ॲक्सिस बँकेकडे क्लायंटच्या ॲक्सिस बँकेतील ठेवी, निधी किंवा इतर मालमत्तेवर, मग ते एकाच नावाने किंवा कोणत्याही व्यक्तीसोबत संयुक्तपणे ठेवलेले असोत, सुविधेच्या परिणामी किंवा त्याच्या संबंधात उद्भवणाऱ्या सर्व थकबाकीच्या मर्यादेपर्यंत, बँकरचे लियन आणि सेट-ऑफ याचा अधिकार असेल.

**13. नुकसानभरपाई**

13.1. ग्राहक सहमत आहे की ग्राहक ॲक्सिस बँक, तिचे अधिकारी, संचालक, एजंट, विक्रेते, भागीदार, सहयोगी, कर्मचारी आणि प्रतिनिधींना सर्व कृती, दावे, मागण्या, प्रकरणे, नुकसान, हानी, खर्च, शुल्क आणि अन्य सर्व प्रकारच्या खर्चापासून, जे ॲक्सिस बँकेला कधीही भोगू लागू शकतात, सहन करावे लागू शकतात किंवा अनुभवू लागू शकतात, सुरक्षित ठेवेल आणि हानिरक्षित ठेवेल, हे सेवा पुरवण्याच्या परिणामस्वरुप किंवा कारणास्तव किंवा ग्राहकाच्या कोणत्याही

दुर्लक्ष/चूक/गैरवर्तन यामुळे किंवा ग्राहकाच्या कोणत्याही अटींचे उल्लंघन किंवा पालन न केल्यामुळे, समाविष्ट कायदा आणि सेवा संबंधित कायदेशीर मार्गदर्शक तत्त्वांसह, किंवा ॲक्सिस बँकेने सद्भावनेने दिलेल्या कोणत्याही सूचनेवर कृती करण्यास किंवा न करण्यास घेतलेल्या निर्णयामुळे उद्भवलेले असेल.

13.2. ग्राहक सहमत आहे की ग्राहकाने केलेल्या कोणत्याही कृती किंवा वगळण्याच्या अनुषंगाने कोणत्याही सरकारी संस्थेने, नियामक प्राधिकरणाने किंवा तृतीय पक्षाने ॲक्सिस बँकेविरुद्ध केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा त्या कारवाईमुळे किंवा त्या कारणास्तव उद्भवणाऱ्या कोणत्याही कृती, दावे, मागण्या, कार्यवाही, तोटा, नुकसान, खर्च, शुल्क आणि खर्चापासून ॲक्सिस बँक, तिचे अधिकारी, संचालक, एजंट, विक्रेते, भागीदार, सहयोगी, कर्मचारी आणि प्रतिनिधींना ग्राहक नुकसानभरपाई देईल आणि त्यांना हानीरहित ठेवेल.

## 14. इंटरनेट बँकिंग रेकॉर्ड आणि व्यवहार अटी

14.1. ॲक्सिस बँक ग्राहकाच्या वतीने पडताळणीसाठी ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने ग्राहकांना खात्यांचे विवरण जारी करेल. ग्राहकाने सूचनांच्या अंमलबजावणीतील कोणत्याही विसंगतीची तक्रार व्यवहाराच्या तारखेपासून 7 (सात) दिवसांच्या आत ॲक्सिस बँकेकडे करावी. ग्राहक सहमत आहे की, ते उपरोक्त कालावधीत विसंगतीची तक्रार करण्यात अयशस्वी झाल्यास, त्याना सूचनांच्या अंमलबजावणीवर किंवा त्याच्या खात्यातून डेबिट केलेल्या रकमेच्या अचूकतेवर वाद घालण्याचा अधिकार राहणार नाही.

14.2. नोंदवलेल्या व्यवहाराच्या वेळेसह, सूचनांमधून उद्भवलेल्या व्यवहारांद्वारे तयार केलेल्या ॲक्सिस बँकेच्या सर्व नोंदी, ॲक्सिस बँकेला मिळालेल्या सूचना आणि त्यानंतर झालेल्या व्यवहाराची अचूकता आणि प्रमाणित असल्याचा पुरावा असतील.

14.3. ग्राहक कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत पुरावा म्हणून ॲक्सिस बँकेच्या नोंदी दाखल करण्यावर आक्षेप न घेण्यास सहमत आहे. कारण अशा नोंदी मूळ , लेखी  किंवा संगणकाद्वारे निर्मित कागदपत्रे नाहीत.

14.4. ॲक्सिस बँकेला ग्राहकाकडून मिळालेल्या सर्व माहितीचा वापर कोणत्याही सक्षम न्यायालयासमोर, न्यायिक किंवा न्यायिकवत प्राधिकरणासमोर किंवा न्यायाधिकरणासमोर किंवा इतर कोणत्याही वैधानिक किंवा सरकारी प्राधिकरणासमोर ग्राहकाच्या विरुद्ध पुरावा म्हणून करण्याची परवानगी आहे.

14.5. ट्रेड पोर्टल सेवांमध्ये व्यवहार सुरू झाल्यापासून कामकाजाच्या दोन दिवसांच्या आत क्लायंटने लागू स्टॅम्पिंग सह सर्व मूळ कागदपत्रे (जेथे लागू असेल तेथे) संबंधित शाखेत सादर करावीत.

**15. समाप्ती**

15.1. या कलम 15 च्या अधीन राहून, ग्राहकाने अटी व शर्तींचे कोणतेही उल्लंघन केल्यामुळे किंवा वापरकर्त्याचा मृत्यू, दिवाळखोरी किंवा कायदेशीर क्षमतेची कमतरता याबद्दल माहिती मिळाल्यास ॲक्सिस बँकेने सर्व किंवा कोणत्याही सेवा बंद केल्या आहेत अशा परिस्थिती वगळता, 30 दिवसांच्या पूर्वसूचनेसह कोणत्याही वेळी सर्व किंवा कोणत्याही सेवा बंद करण्याचा अधिकार ॲक्सिस बँक राखून ठेवते.

15.2. ग्राहकाचे खाते बंद केल्याने सेवा समाप्त होईल.

15.3. या संदर्भात दुसऱ्या पक्षाला 30 दिवसांची पूर्वसूचना देऊन येथे प्रदान केलेल्या सेवा रद्द करण्याचा अधिकार ग्राहकाला आहे.

15.4. सेवा समाप्तीमुळे किंवा बंद केल्यामुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी, दाव्यांसाठी, तोट्यासाठी, कोणत्याही प्रकारच्या खर्चासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.

**16. दैवी आपत्ती**

16.1. जर एखाद्या दैवी आपत्ती घटनेमुळे कामगिरी रोखली गेली, अडथळा आणला गेला किंवा विलंब झाला तर या अटी व शर्तींनुसार तिच्या कोणत्याही दायित्वांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यास ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही आणि अशा परिस्थितीत दैवी आपत्ती घटना सुरू राहीपर्यंत तिची दायित्वे स्थगित राहतील (परंतु या तरतुदीसाठी देय असलेल्या मुद्दल रकमेवरील व्याज उपार्जनास यामुळे प्रतिबंध होणार नाही). "दैवी आपत्ती घटना" म्हणजे ॲक्सिस बँकेच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही कारणामुळे होणारी कोणतीही घटना, ज्यामध्ये मर्यादा नसणे, नेटवर्क बिघाड, संगणक प्रणालीतील, स्टोरेज डिव्हाईसमधील दोष, नैसर्गिक आपत्ती, कायदेशीर निर्बंध किंवा इतर कोणतेही कारण समाविष्ट आहे.

**17. शुल्क**

17.1. ग्राहक याद्वारे ॲक्सिस बँकेने वेळोवेळी निर्धारित केलेल्या सेवांवर लागू होणारे सर्व शुल्क (वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) सह सर्व लागू कर वगळून असतील आणि ते ग्राहक/खातेदाराने भरावे लागतील) देण्यास सहमत आहे, किंवा सेवांचा लाभ घेण्यासाठी वेळोवेळी मान्य केलेले दर/शुल्क आणि ॲक्सिस बँकेला योग्य वाटेल अशा वेबसाइटद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमातून ग्राहकांना कळवले जातील. ॲक्सिस बँक ग्राहकांच्या खात्यातून असे शुल्क डेबिट करण्यास अधिकृत आहे.

17.2. बँक याद्वारे देखील सहमत आहे आणि खालीलप्रमाणे हमी देते

(i) बँक निर्मित बिलावर (जर असल्यास) ग्राहकाने दिल्याप्रमाणे ग्राहकाचा जीएसटी क्रमांक असेल;

(ii) ग्राहकांना केलेल्या पुरवठ्यासाठी विहित नमुन्यात बँक जीएसटीआयएन सामायिक पोर्टलवर बिल (जर असल्यास) तपशील अपलोड करेल; आणि

(iii) ग्राहकांना केलेल्या पुरवठ्यावर बँक लागू असलेला जीएसटी भरेल आणि वैधानिक वेळेच्या मर्यादेत जीएसटी कायद्यांतर्गत विहित केल्यानुसार जीएसटी परतावा दाखल करेल.

17.3. सेवा शुल्क आणि लागू फी तपशील

**18. वापरकर्त्याचे दायित्व**

जर वापरकर्त्याने अटींचे उल्लंघन केले असेल किंवा खालीलप्रमाणे निष्काळजी कृती करून नुकसान केले किंवा होऊ दिले असेल, तर ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग अकाउंटमध्ये झालेल्या अनधिकृत व्यवहारांमुळे होणारे नुकसान यासाठी फक्त वापरकर्ताच जबाबदार राहील:

- ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग पासवर्डचा लिखित किंवा इलेक्ट्रॉनिक नोंद ठेवणे
- ॲक्सिस बँकेचा इंटरनेट बँकिंग पासवर्ड कोणत्याही अल्पवयीन व्यक्तीसह, बँक कर्मचाऱ्यांसह इतर कोणालाही उघड करणे किंवा उघड होण्यापासून रोखण्यासाठी सर्व वाजवी पाऊले उचलण्यास अयशस्वी होणे आणि/किंवा वाजवी वेळेत अशा खुलास्याची माहिती बँकेला देण्यास अयशस्वी होणे.
- जर ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग खात्यात अनधिकृत ॲक्सेस किंवा चुकीचे व्यवहार झाले, तर त्यासंबंधी बँकला तर्कसंगत वेळेत सूचित न करणे.
- नैसर्गिक आपत्ती, पूर, आग किंवा कोणत्याही प्रकारच्या इतर नैसर्गिक आपत्ती, कायदेशीर प्रतिबंध, दूरसंचार नेटवर्क किंवा इंटरनेटची तांत्रिक त्रुटी किंवा नेटवर्क फेल्युअर, वीज खंडित होणे किंवा यूपीएस फेल्युअर, सॉफ्टवेअर किंवा हार्डवेअर फेल्युअर आणि/किंवा त्रुटी यासारख्या, परंतु त्यापुरते मर्यादित नसलेल्या कारणांसाठी किंवा बँकेच्या तर्कसंगत नियंत्रणाबाहेरील इतर कोणत्याही कारणांमुळे ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग इच्छित प्रकारे उपलब्ध नसेल, तर बँक वापरकर्त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकारल्याप्रमाणे 'सायबर संबंधित गुन्हे' च्या व्याख्येनुसार वापरकर्त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीद्वारे अकाउंट हॅकिंगमुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. कोणत्याही परिस्थितीत बँक कोणत्याही प्रकारच्या हानीबाबत जबाबदार राहणार नाही, जरी ती हानी थेट, अप्रत्यक्ष, संयोगात्मक, परिणामी स्वरूपाची असली तरीही; तसेच ती हानी उत्पन्न, गुंतवणूक, उत्पादन, प्रतिष्ठा, नफा, व्यवसायातील व्यत्यय किंवा कोणत्याही स्वरूपाची किंवा प्रकाराची असो, आणि ती हानी वापरकर्त्याला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला झाली तरीही.

**19. एमआयएस/रिपोर्ट्स**

19.1. बँक विवेकबुद्धीनुसार, या सुविधा/सुविधांशी/सेवांशी संबंधित डाटा, विवरण आणि अहवाल सह माहिती क्लायंटला (a) क्लायंटने दिलेल्या पत्त्यावर इलेक्ट्रॉनिक मेलद्वारे किंवा (b) एसएमएस सह इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देऊ शकते. क्लायंटला हे माहित आहे की अशी

माहिती गोपनीय स्वरूपाची असेल आणि असे प्रसारण होत असताना कोणत्याही व्यक्तीकडून ती माहिती रोखली जाऊ शकते. वाचली जाऊ शकते, सुधारित केली जाऊ शकते किंवा बदलली जाऊ शकते आणि इंटरनेट संप्रेषण वेळेवर, सुरक्षित, त्रुटी किंवा व्हायरस-मुक्त असल्याची हमी देता येत नाही. बँक कोणताही विलंब, त्रुटी किंवा चुका यासाठी जबाबदार राहणार नाही आणि इंटरनेटवरून पाठवल्या जाणाऱ्या अशा माहितीमुळे होणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष किंवा त्या परिणामी झालेल्या नुकसानासाठी बँक जबाबदार राहणार नाही. मग ते बँक किंवा इतर तृतीय पक्षाकडून झाले असेल.

**20. अ-हस्तांतरणीयता आणि अ-नियुक्तीक्षमता**

20.1. ग्राहकाला सेवा देणे कोणत्याही परिस्थितीत हस्तांतरणीय नाही आणि ती फक्त ग्राहकाद्वारेच वापरली जाईल. ग्राहक सेवा किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात त्याचे अधिकार आणि/किंवा दायित्वे इतर कोणत्याही व्यक्तीला सोपवू शकत नाही. ॲक्सिस बँक, सेवांशी संबंधित तिची कोणतेही दायित्वे पूर्ण करण्यासाठी एजंट्सना उपकंत्राट देऊ शकते आणि नियुक्त करू शकते.

**21. शासित कायदा आणि अधिकारक्षेत्र**

21.1. सेवांची रचना, वैधता आणि कामगिरी आणि या अटी व शर्ती सर्व बाबतीत भारताच्या कायद्यांद्वारे नियंत्रित केल्या जातील. याद्वारे पक्षकार मुंबई येथील न्यायालयांच्या अ-विशेषाधिकारक्षेत्रात सादर करतात. ग्राहकाने ॲक्सिस बँकेच्या कस्टमर इंटरनेट बँकिंग सेवा यामध्ये लॉग इन करून किंवा अन्यथा ॲक्सेस करून किंवा त्यांचा वापर करून वरील अटी व शर्ती याबद्दलचे त्याचे ज्ञान आणि स्वीकृती दर्शविली पाहिजे. ग्राहक उपरोक्त कोणत्याही अटी किंवा शर्तींशी सहमत नसल्यास, ग्राहकाने वेबसाईटवर लॉग इन करण्यासह ॲक्सिस बँकेच्या ग्राहक इंटरनेट बँकिंग सेवा याचा इतर कोणत्याही प्रकारे वापर करू नये किंवा वापर करण्याचा प्रयत्न करू नये.

**22. जोखीम**

ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग ॲप्लिकेशन वापरून, ग्राहक डिजिटल आणि इंटरनेट बँकिंग सेवांशी संबंधित अंतर्निहित जोखीम मान्य करतो आणि समजतो. ॲक्सिस बँक मजबूत सुरक्षा उपाययोजना प्रदान करण्याचा प्रयत्न करत असली तरी, बँकेच्या नियंत्रणाबाहेरील घटकांमुळे बँक संपूर्ण सुरक्षिततेची हमी देऊ शकत नाही, हे ग्राहक मान्य करतो. ग्राहक स्पष्टपणे सहमत आहे आणि खालील संभाव्य जोखीमांना मान्य करतो:

- **अनधिकृत ॲक्सेस:** जर ग्राहकाचे क्रेडेन्शियल्स, ज्यामध्ये पिन, पासवर्ड किंवा उपकरण सुरक्षा सेटिंग्स समाविष्ट आहे, ते बाधित झाल्यास अनधिकृत ॲक्सेस होऊ शकतो. ग्राहक सहमत आहे की या क्रेडेन्शियल्सची गोपनीयता राखणे ही त्यांची एकमेव जबाबदारी आहे.
- **सायबर-हल्ला**: ग्राहक हे मान्य करतो की, इंटरनेट बँकिंग सेवा सायबर धमक्यांसाठी संवेदनशील आहेत, ज्यात हॅकिंग, मालवेअर, रॅन्समवेअर आणि व्हायरसेस यांचा समावेश आहे, आणि या धमक्या वैयक्तिक व आर्थिक माहिती धोक्यात आणू शकतात.
- **फिशिंग आणि सोशल इंजिनीअरिंग हल्ला:** ग्राहकांना फिशिंग ईमेल, बनावट वेबसाईट्स, कॉल्स, मेसेज किंवा इतर फसव्या पद्धतींनी संवेदनशील बँकिंग क्रेडेन्शियल्स मिळवण्यासाठी लक्ष्य केले जाऊ शकते. ग्राहकाने सतर्क आणि सावध राहावे, तसेच संशयास्पद विनंत्यांना उत्तर देणे टाळावे.
- **मालवेअर हल्ले:** डिव्हाईसवर त्रुटीयुक्त सॉफ्टवेअर (मालवेअर) इंस्टॉलेशनमुळे वैयक्तिक डाटा, लॉग-इन क्रेडेन्शियल आणि व्यवहाराचे तपशिल यामध्ये अनधिकृत ॲक्सेस होऊ शकतो. ग्राहकांनी त्यांचे उपकरण विश्वसनीय सुरक्षा सॉफ्टवेअरसह संरक्षित असल्याची खात्री करणे आवश्यक आहे आणि अविश्वसनीय स्रोतांकडून ॲप्लिकेशन्स डाउनलोड करणे टाळणे आवश्यक आहे.
- **प्रक्रिया त्रुटी:** सिस्टीमच्या त्रुटी, सॉफ्टवेअर बग किंवा मानवी इनपुट त्रुटींमुळे, व्यवहार अयशस्वी होणे यासारखे परंतु त्यापुरते मर्यादित नसलेल्या प्रक्रियेतील त्रुटी उद्‌भवू शकतात. ग्राहक स्पष्टपणे सहमत होतो की, बँकेच्या गहन उपेक्षा किंवा जाणूनबुजून केलेल्या चुकीमुळे झालेल्या घटनांचा अपवाद वगळता, अशा कोणत्याही त्रुटी किंवा नुकसानाबद्दल ॲक्सिस बँक जबाबदार ठरणार नाही.
- **व्यवहाराशी संबंधित जोखीम:** इंटरनेट बँकिंगद्वारे केलेले व्यवहार कधी कधी तांत्रिक अडचणी, नेटवर्क अपयश, सर्व्हर बंद पडणे किंवा व्यवहार प्रक्रिया त्रुटींमुळे विलंबित होऊ शकतात, अयशस्वी ठरू शकतात किंवा त्यामध्ये अचूकतेचा अभाव राहू शकतो. ॲक्सिस बँक त्याच्या वाजवी नियंत्रणाबाहेरील अशा व्यवहारातील व्यत्ययामुळे उद्‌भवणाऱ्या नुकसानीसाठी जबाबदार असणार नाही.
- **सुरक्षा उल्लंघन:** जरी सक्षम सायबरसुरक्षा पायाभूत सुविधा लागू असल्या तरीही, अनधिकृत प्रवेश, हॅकिंग प्रयत्न किंवा डाटा उल्लंघन यांचा काही प्रमाणात धोका कायम राहतो. ग्राहक मान्य करतात की बँकेच्या वाजवी नियंत्रणाबाहेर असलेल्या कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही.
- **डाटा उल्लंघन:** ग्राहक समजतो की ॲक्सिस बँकद्वारे वाजवी प्रयत्न करूनही डाटा उल्लंघन होऊ शकते. अशा उल्लंघनांमुळे संवेदनशील वैयक्तिक आणि आर्थिक माहिती उघड होऊ शकते, ज्यामुळे ओळख चोरी, आर्थिक फसवणूक आणि गोपनीयतेचा भंग होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.
- **तृतीय पक्ष सेवा प्रदाता:** ॲक्सिस बँक काही सेवांसाठी तृतीय पक्ष सेवा प्रदात्यांना नियुक्त करू शकते. ग्राहकास माहिती आहे की तृतीय-पक्ष सेवा प्रदात्यांवर अवलंबून राहणे काही धोके घेऊन येऊ शकते, ज्यात अशा तृतीय-पक्षांद्वारे सेवा अपयश किंवा डेटा सुरक्षिततेचे उल्लंघन होणे यांचा

समावेश आहे.. बँक तृतीय-पक्ष संस्थांद्वारे झालेल्या कोणत्याही डेटा उल्लंघन किंवा सेवा अपयशासाठी जबाबदार राहणार नाही.

- **सेवा अनुपलब्धता**: कधी कधी, नियोजित मेंटेनन्स, सिस्टीम अपडेट्स किंवा अनपेक्षित तांत्रिक समस्यांमुळे इंटरनेट बँकिंग सेवा विस्कळीत होऊ शकतात. ग्राहक समजतात आणि स्वीकारतात की अशा कालावधीत बँकिंग सेवांचा ॲक्सेस करण्यास होणारा कोणताही विलंब, व्यत्यय किंवा असमर्थतेसाठी ॲक्सिस बँक जबाबदार धरली जाणार नाही.
- **नियामक आणि कायदेशीर जोखीम:** इंटरनेट बँकिंग नियामक फ्रेमवर्क, मार्गदर्शक तत्त्वे आणि अनुपालन आवश्यकतांमधील बदलांच्या अधीन आहे. कायदा किंवा नियमांमधील बदल इंटरनेट बँकिंग सेवांची कार्यक्षमता, उपलब्धता किंवा सुरक्षा मानकांवर परिणाम करू शकतात.

ग्राहक सहमत आहे की बँकिंग सेवांच्या वापरातील या किंवा इतर जोखीमांमुळे होणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, प्रासंगिक किंवा परिणामी नुकसानीसाठी ॲक्सिस बँक जबाबदार असणार नाही.

**23. जोखीम कमी करण्यासाठी ग्राहकाची कर्तव्ये**

- ॲप्लिकेशन्स आणि ऑपरेटिंग सिस्टीम नियमितपणे नवीन आवृत्तींमध्ये अपडेट करा.
- बँकिंग व्यवहार करण्यासाठी असुरक्षित सार्वजनिक वाय-फाय नेटवर्कचा वापर टाळावा.
- कोणत्याही संशयास्पद किंवा अनधिकृत व्यवहारांचे वेळेवर निदान होण्यासाठी अकाउंट स्टेटमेंट आणि व्यवहार अलर्ट नियमितपणे तपासावेत.
- डिव्हाईस आणि/किंवा बँकिंग क्रेडेन्शियलचे कोणतेही नुकसान, चोरी किंवा त्यांची सुरक्षितता भंग झाल्यास ॲक्सिस बँकेला त्वरित रिपोर्ट करा.
- वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती मागणाऱ्या अनाहूत संपर्कांना प्रतिसाद देताना ग्राहकांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.
- सुरक्षा राखण्यासाठी आणि असुरक्षितता कमी करण्यासाठी नियमितपणे पासवर्ड आणि पिन बदला.

**ॲक्सिस बँकच्या उपाययोजना:**

- ॲक्सिस बँक ग्राहक डेटाचे संरक्षण करण्यासाठी एन्क्रिप्शन, फायरवॉल्स, सुरक्षित प्रमाणीकरण पद्धती आणि नियमित सुरक्षा ऑडिटसह प्रगत सुरक्षा उपायांचा वापर करते. या सर्व प्रयत्नांनंतरही जोखमींपासून पूर्णतः संरक्षण मिळेल याची हमी देता येत नाही, हे ग्राहक मान्य करतो.
- ग्राहक सहमती देतो की, बँकेच्या सिद्ध गहन निष्काळजीपणामुळे किंवा हेतुपुरस्सर गैरवर्तनामुळे निर्माण झालेल्या प्रकरणांव्यतिरिक्त, ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग ॲप्लिकेशनच्या वापरामध्ये अंतर्भूत असलेल्या वर नमूद केलेल्या धोक्यांमुळे किंवा इतर कोणत्याही धोक्यांमुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, परिणामी किंवा आनुषंगिक नुकसान, हानी, दावे, दायित्वे किंवा खर्चासाठी ॲक्सिस बँक जबाबदार राहणार नाही.
- ॲक्सिस बँक इंटरनेट बँकिंग ॲप्लिकेशनचा वापर पुढे चालू ठेवून, ग्राहक वरील जोखमी, त्यांच्या जबाबदाऱ्या आणि ॲक्सिस बँकेच्या दायित्वाच्या मर्यादा समजून घेणे आणि स्वीकृतीची पुष्टी करतो.

**24. सुरक्षित बँकिंग**

**काय करावे आणि करू नये**

- ॲक्सिस बँक, आरबीआय किंवा अशा इतर कोणत्याही संस्था कधीही तुमची वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती विचारणा करणारे कॉल करत नाही किंवा ईमेल वा एसएमएस पाठवत नाहीत. अशा फसवणूकीला बळी पडू नका.
- ज्या संदेशातील किंवा प्रेषकाकडून आलेल्या युआरएल बद्दल आपण निश्चित नाही, अशा कोणत्याही लिंकवर क्लिक करू नये.
- एटीएम कार्ड वापरण्यासाठी किंवा शाखेत रोख रक्कम हाताळण्यासाठी अनोळखी व्यक्तींची मदत घेऊ नका आणि व्यवहार करताना त्यांना तुमच्यावर लक्ष ठेवू देऊ नका.
- सायबर कॅफे/शेअर्ड कॉम्प्युटरमधून तुमचे इंटरनेट बँकिंग अकाउंट ॲक्सेस करणे टाळा. जर तुम्हाला असे करायचे असेल तर तुमच्या स्वतःच्या कॉम्प्युटरमधून तुमचे पासवर्ड बदला.
- व्यवहाराचे अलर्ट नियमितपणे मिळविण्यासाठी तुम्ही बँककडे अचूक मोबाइल नंबर अपडेट केला आहे याची खात्री करा.

**सुरक्षित वापर मार्गदर्शक तत्त्वे**

- अज्ञात ग्राहकांना इंटरनेट बँकिंग ॲक्सेस देऊ नका.
- कलेक्शन विनंती स्वीकारण्यापूर्वी, मंजुरी अचूक व योग्य प्राप्तकर्त्यासच दिली गेली आहे याची ग्राहकाने दक्षतापूर्वक पुष्टी करावी.
- जर तुमचा मोबाइल नंबर बदलला असेल तर तुम्हाला एसएमएस नोटिफिकेशन सतत मिळत राहण्यासाठी तुमच्या नवीन मोबाइल नंबरविषयी बँकला सूचित करण्यास विसरू नका.
- कॉलर ट्यून्स डायलर ट्यून्स किंवा ज्ञात किंवा अज्ञात स्रोतांकडून ईमेल किंवा अटॅचमेंट उघडताना/डाउनलोड करताना सावध राहा.
- तुमच्या फोन/कॉम्प्युटरवर क्रेडिट कार्ड तपशील, इंटरनेट बँकिंग पासवर्ड, ग्राहक आयडी इ. सारखी संवेदनशील माहिती स्टोअर करू नका.
- तुमचा पिन नियमितपणे बदला.
- सार्वजनिक ठिकाणी ब्ल्यूटूथ वापरताना सावध राहा कारण कोणीतरी तुमचा गोपनीय डाटा/माहिती ॲक्सेस करू शकेल.
- बँककडून आलेले असल्याचा दावा करणाऱ्या ई-मेल किंवा सोशल नेटवर्किंग साइटवरील लिंकवर क्लिक करू नये

**25. जोखीम आणि ग्राहकाची जबाबदारी**

- ग्राहकाने दिलेल्या मोबाइल नंबरवर आणि/किंवा ई-मेल पत्त्यावर बँक संबंधित अलर्ट तसेच अकाउंटशी संबंधित माहिती पाठवेल. बँकेला प्रदान केलेला मोबाइल नंबर आणि ईमेल पत्ता अचूक आहे आणि बँकेच्या रेकॉर्डमध्ये अपडेट ठेवला आहे याची खात्री करणे ही ग्राहकाची पूर्णपणे स्वतःची जबाबदारी आहे.

- ग्राहक त्यांचे डिव्हाईस आणि ईमेल अकाउंटच्या सुरक्षेचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे जबाबदार आहे. संपर्क माहितीची अचूकता किंवा सुरक्षितता राखण्यात, अथवा त्यातील कोणताही बदल बँकेस कळविण्यात ग्राहकाकडून कोणतीही त्रुटी झाल्यास, त्याचे सर्वस्वी जोखीम व दायित्व ग्राहकावरच राहील. सदर सुविधा प्राप्त करणे सुरू ठेवण्यासाठी ग्राहकाने त्यांचा मोबाइल फोन आणि ईमेल आयडी सक्रिय ठेवणे ही ग्राहकाची जबाबदारी असेल.
- ग्राहक स्पष्टपणे मान्य करतो आणि स्वीकारतो की मोबाइल फोन आणि/किंवा ईमेलद्वारे माहिती पाठविणे मूलतः असुरक्षित आहे आणि काही जोखमींच्या अधीन आहे. अशा जोखीमा असूनही, ग्राहकाने, त्यांच्या स्वत:च्या सोयीसाठी आणि अशा जोखमींचे काळजीपूर्वक मूल्यांकन केल्यानंतर, या चॅनेल्सद्वारे प्राप्त झालेल्या सूचना किंवा संवादावर कार्य करण्यासाठी बँकेला स्वेच्छिकपणे विनंती केली आहे आणि अधिकृत केले आहे.
- ग्राहकाने आवश्यकतेनुसार खरी, संपूर्ण व योग्य माहिती प्रदान करणे अनिवार्य असून, बँकेस कोणत्याही वेळी दिलेल्या डेटाच्या अचूकतेबाबतची सर्वस्वी दायित्वे ग्राहकावरच राहील. ग्राहकाने पुरवलेल्या त्रुटीपूर्ण किंवा चुकीच्या माहितीमुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिणामांसाठी बँक जबाबदार धरली जाणार नाही.
- ग्राहकाला बँकेने दिलेल्या माहितीमध्ये त्रुटी असल्याचा संशय वाटल्यास, ग्राहकाने लगेचच बँकेला कळविणे आवश्यक आहे. दुरुस्ती शक्य असल्यास, बँक आपल्या सर्वोत्तम प्रयत्नांच्या तत्वावर संबंधित चूक सुधारण्याचा प्रयत्न करेल.
- ग्राहकाला अलर्ट किंवा इंटरनेट बँकिंग सेवा ज्या मोबाईल नंबरवर व/किंवा ईमेल पत्त्यावर प्राप्त करावयाच्या आहेत, त्यामध्ये कोणताही बदल झाल्यास, त्याची अधिसूचना ग्राहकाने कोणत्याही विलंबाविना बँकेकडे देणे आवश्यक असेल.
- सर्व अकाउंटशी संबंधित व्यवहार लागू असलेल्या बँकिंग प्रथा तसेच ग्राहकाच्या अकाउंटवर व संबंधित सेवांवर लागू असलेल्या वर्तमान अटी, शर्ती आणि नियमांच्या अधीन राहतील. तसेच, फोन बँकिंग आणि नेट बँकिंग सेवांशी संबंधित अटी व शर्ती, संबंधित मर्यादेपर्यंत, मोबाइल बँकिंग/अलर्ट सुविधेवरही लागू होतील.
- ग्राहक बँकेने ठरवलेल्या पात्रतेनुसार मोबाइल बँकिंग किंवा अलर्ट्स सुविधा वापरण्यासाठी विनंती करू शकतात. ग्राहक बँकेकडून वेळोवेळी ठरविलेल्या किंवा उपलब्ध करून दिलेल्या पद्धतीनुसार अलर्ट्स सुरू करणाऱ्या घटनांचा प्रकार देखील निर्दिष्ट करू शकतो. बँक त्यांच्या विवेकबुद्धीनुसार आणि कोणतेही कारण न देता अशा कोणत्याही ॲप्लिकेशनला नाकारण्याचा पूर्ण अधिकार राखून ठेवते.

## 26. परिशिष्ट - बल्क पेमेंट सर्व्हिसेस (पेप्रो)

1. पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूल ही बँकेद्वारे दिली जाणारी एक वेब-आधारित पेमेंट सेवा आहे ज्यामध्ये बँकेचे ग्राहक क्लायंट हे बँकेला सदर ग्राहक क्लायंटने दिलेल्या माहितीच्या

आधारे ग्राहक क्लायंटने निश्चित केल्यानुसार ग्राहक क्लायंटच्या बँकेतील अकाउंटमधून विशिष्ट लाभार्थ्यांना निधी पाठवण्याची  विनंती करू शकतात.

2. बँकेने ठरवून दिलेल्या अटी व शर्तींवर, ग्राहक ॲक्सिस बँकेच्या विविध उत्पादनांमध्ये सिंगल अपलोड सुविधेसाठी पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूलची सेवा घेऊ इच्छित आहे आणि त्यासाठी त्याने बँकेशी संपर्क साधला आहे. ग्राहकाच्या अकाउंटमध्ये क्लीअर फंड्स उपलब्ध असल्यास, ग्राहकाच्या आवश्यकतेनुसार पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूल अंतर्गत फंड ट्रान्सफर, आयएमपीएस, एनईएफटी, आरटीजीएस, चेक प्रिंटिंग, डिमांड ड्राफ्ट प्रिंटिंग, कॅश डिलिव्हरी कॉर्पोरेट चेक आणि कॉर्पोरेट डीडी अशा सेवा देण्यास बँकेने सहमती दर्शविली आहे.
3. पेमेंट प्लॅटफॉर्म सॉफ्टवेअर बँकेला फंड ट्रान्सफर, आयएमपीएस, एनईएफटी, आरटीजीएस, चेक प्रिंटिंग, डिमांड ड्राफ्ट प्रिंटिंग, कॉर्पोरेट चेक आणि कॉर्पोरेट डीडी, कॅश डिलिव्हरी फाईल्स आणि सॉफ्टवेअरद्वारे ऑफर केलेल्या इतर सेवांवर प्रोसेसिंग करण्यास सक्षम करेल. त्यानंतर ग्राहक इंटरनेटद्वारे फाईल्स अपलोड करेल.
4. अपलोड प्रक्रियेसाठी तपशीलवार प्रक्रिया प्रवाह जो ग्राहकाद्वारे अनुसरण केला जाईल तो खाली नमूद केला आहे. सदर प्रक्रियेतून कोणत्याही विचलनास परवानगी दिली जाणार नाही.
5. प्रक्रिया प्रवाह नुसार ग्राहकाने अपलोड केलेल्या तपशीलांच्या आधारे ग्राहक याद्वारे बँकेला चेक/डीडी प्रिंट करण्यास आणि/किंवा आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्सफर/आयएमपीएस व्यवहार त्याच्या वतीने कार्यान्वित करण्यासाठी प्राधिकृत करतो. ग्राहक अशी हमी देतो की, इंटरनेट किंवा इतर कोणत्याही माहिती तंत्रज्ञान प्रणालीशी संबंधित कोणत्याही विफलतेसाठी किंवा विलंबासाठी तो बँकेला जबाबदार धरणार नाही, परंतु अशी विफलता बँकेची अक्षम्य आणि जाणूनबुजून केलेली हयगय यामुळे झाली नसल्यास.
6. ग्राहकाच्या चेक प्रिंटिंगच्या विनंतीच्या संदर्भात, ग्राहक हे मान्य करतो आणि स्वीकारतो की बँक फक्त त्या विशिष्ट खात्याअंतर्गत बँकेने छापलेल्या इन्स्ट्रुमेंटचा स्वीकार करेल. ग्राहकाने बँकेला त्याचा नमुना दिला असेल आणि तो ग्राहकाने बँकेला दिलेल्या संचालक मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने असेल तर ग्राहकाकडून मिळालेल्या प्रतिरूप स्वाक्षऱ्यावर आधारित लेखांचा बँक स्वीकार करेल अशी पार्टींनी आणि पार्ट्यांमध्ये सहमती झाली आहे. प्रतिरूप स्वाक्षरी वर आधारित इन्स्ट्रूमेंटचा स्वीकार, बँकद्वारे केवळ ग्राहकाच्या जोखमीवर आणि जबाबदारीवर केला जाईल. ग्राहक पुढे सहमत आहे की या कराराअंतर्गत विचारात घेतलेल्या व्यवस्थे बाहेर शाखांमध्ये सादर केलेले सर्व चेक न चुकता परत केले जातील आणि अशा परत केलेल्या इन्स्ट्रूमेंट साठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही. ग्राहक पुढे सहमत आहे की एकदा बँकेने चेक, डीडी, कॉर्पोरेट

चेक, कॉर्पोरेट डीडी प्रिंट केल्यानंतर, ते कुरिअर सेवेद्वारे किंवा पोस्टद्वारे ग्राहकांना हाताने वितरित केले जातील किंवा पाठवले जातील. हे स्पष्टपणे मान्य केले आहे की अशी पाठवणी ग्राहकाच्या स्वतःच्या जोखमीवर आणि जबाबदारीवर असेल आणि या अटी आणि शर्तींच्या उद्देशाने सदर कुरिअर सेवा/पोस्ट ग्राहकाचा एजंट मानली जाईल.

7. ग्राहकाने अशी हमी दिली आहे की, डाटा अधिकृत व्यक्तीद्वारे अपलोड केला जाईल आणि ग्राहक बँकेला या अधिकृततेचा पुरावा देणाऱ्या मंडळाच्या ठरावाची प्रत सादर करेल. बँकेत उघडलेल्या अकाउंटमध्ये अधिकृतकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या देखील अपडेट केल्या जातील.
8. बँकेविरुद्ध या अटी व शर्तींमध्ये कोणतीही उपलक्षित कर्तव्ये किंवा दायित्वे वाचली जाणार नाहीत किंवा वाचल्याचे मानले जाणार नाहीत. वर उल्लेख केल्याप्रमाणे निधी पाठवण्याच्या कर्तव्याच्या व्यतिरिक्त, ग्राहक आणि/किंवा लाभार्थी यांच्यात झालेल्या कोणत्याही कराराच्या, व्यवस्थेच्या किंवा समजुतीच्या तरतुदी बँकेला बंधनकारक राहणार नाहीत.
9. बँकेला उपरोक्त साईटवर प्राप्त झालेल्या विनंत्यांची सत्यता आणि/किंवा वैधता आणि/किंवा अधिकृतता तपासल्याशिवाय पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूल वरील उपरोक्त विनंत्यांवर कारवाई करण्याचा अधिकार बँकेला असेल आणि अशा विनंत्या ग्राहकाने अधिप्रमाणित, वैध आणि योग्यरित्या अधिकृत मानल्या जातील. ग्राहक याद्वारे सहमत आहे की, ग्राहकाने पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूलद्वारे बँकेला दिलेल्या वरील नमूद केलेल्या विनंत्यांशी ग्राहक अपरिवर्तनीयपणे आणि बिनशर्तपणे बांधील असेल आणि ग्राहकाने उपरोक्त साईटवर पाठवलेल्या अशा कोणत्याही विनंत्यांची अधिप्रमाणता, वैधता किंवा अधिकृतता यावर विवाद करण्याचा अधिकार ग्राहकाला राहणार नाही.
10. ग्राहकाने अशी हमी दिली आहे की, त्याला दिलेली वेब सुविधा बँकेने निर्धारित केलेल्या विशिष्ट उद्देशासाठी वापरली जाईल.
11. ग्राहकाला केलेल्या व्यवहारांची माहिती मिळेल आणि अपलोड केलेल्या डाटासह चेक लिस्ट क्रॉस चेक करणे ही ग्राहकाची जबाबदारी असेल.
12. ऑनलाइन पासवर्ड जनरेशन आणि रिसेट सुविधा उपलब्ध असल्यास (फक्त बल्क अपलोड सुविधा घेणाऱ्या ग्राहकांसाठी), बँक पासवर्ड पाठवण्यासाठी दिलेली ही माहिती नोंद करेल असे समजले जाते. कोणत्याही वापरकर्त्याच्या मोबाईल नंबरमध्ये किंवा ईमेल आयडीमध्ये किंवा टोकनमध्ये कोणताही बदल झाल्यास, अधिकृत स्वाक्षरीकर्त्याने स्वाक्षरी करून, जेव्हा जेव्हा असा बदल होईल तेव्हा बँकेला लेटर हेड वर कळवले जाईल. नोंदणीकृत माहितीमध्ये बदल करण्यासाठी बँकेला उशिरा माहिती दिल्यास किंवा कोणतीही माहिती न दिल्यास ग्राहक बँकेच्या कृतींसाठी बँकेला क्षतिपूर्ती करेल.

ग्राहकांच्या वतीने फाईल अपलोडसाठी प्रक्रिया प्रवाह.

1. परस्पर सहमतीने पूर्वनिर्धारित फॉरमॅटमध्ये क्लायंटद्वारे थेट पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूलवर डाटा अपलोड केला जाईल. प्रत्येक कॉर्पोरेटला एकापेक्षा जास्त उत्पादने नियुक्त केली जाऊ शकतात. क्लायंटला हवे असल्यास, ते वेगवेगळ्या उत्पादनांशी संबंधित डाटा सिंगल फाईलद्वारे अपलोड करू शकतात.
2. डाटा अपलोड करण्यासाठी पेमेंट प्लॅटफॉर्मच्या वेब इंटरफेसवर लॉग-इन करून कॉर्पोरेट्स इंटरनेटद्वारे कुठूनही डाटा अपलोड करू शकतात. पेमेंट प्लॅटफॉर्म ॲक्सेस करण्यासाठी कॉर्पोरेटला लॉग-इन आयडी आणि पासवर्ड दिला जाईल.
3. ॲक्सिस बँक ॲडमिनला कॉर्पोरेट वापरकर्ते परिभाषित करण्याचे आणि मास्टर संबंधित क्रियाकलाप करण्याचे अधिकार असतील. आवश्यकतेनुसार, जर आवश्यक अधिकार मागितले गेले असतील आणि आवश्यक कागदपत्रे बँकेला सादर केली गेली असतील तर कॉर्पोरेट कंपन्यांना स्वतंत्रपणे समान क्रियाकलाप करण्यासाठी समान अधिकार प्रदान केले जाऊ शकतात.
4. डाटा अपलोड करण्यासाठी आणि डाटाची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी अधिकृततेसाठी मेकर चेकर संकल्पना असेल.
5. कॉर्पोरेट विहित अधिकृतता मॅट्रिक्स नुसार फाईल/फाईल्स अधिकृत करू/नाकारू शकते. लॉग-इन केलेल्या वापरकर्त्याला निवडलेली फाईल अपलोड करण्याचे अधिकार आहेत की नाही हे तपासण्यासाठी अधिकृतता केली जाते.
6. मूलभूत प्रमाणीकरण केले जाईल. खालील मुद्दे तपासले जातील:
   a) एकाच नावाची फाईल एकापेक्षा जास्त वेळा अपलोड करण्याची अनुमती नाही.
   b) प्रत्येक व्यवहारासाठी क्लायंटने युनिक नंबर दिला असल्यास, समान व्यवहार एकापेक्षा जास्त वेळा अपलोड करण्याची परवानगी देऊ नये.
   c) कॉर्पोरेट आयडी आणि कॉर्पोरेट फॉरमॅट आणि प्रॉडक्ट आयडीचे प्रमाणीकरण.
   d) अपलोड केलेल्या फाईलमध्ये पेमेंट करण्यासाठी आवश्यक असलेली अनिवार्य फील्ड आहेत का ते तपासा.
   e) डाटा फाईलमधील सिंगल फील्ड साठी सेंट्रल डाटाबेस फॉरमॅटमध्ये निर्दिष्ट केलेल्या फील्ड टाईप आणि फील्ड लेंथ तपासा.
7. विविध कारणांमुळे कोणतीही फाईल नाकारल्याच्या बाबतीत, सिस्टीमद्वारे नाकारण्याचे कारण समोरील बाजूस दर्शविले जाईल जे क्लायंटद्वारे सुधारित केले जाऊ शकते आणि सुधारित डाटा पुन्हा अपलोड केला जाऊ शकतो.

8. अपलोड केलेल्या कॉर्पोरेट डाटामध्ये कॉर्पोरेट अकाउंट नंबर असेल. अपलोड केलेल्या कॉर्पोरेट डाटामध्ये अकाउंट नंबर उपलब्ध नसल्यास, डिफॉल्ट व्हेल्यू वापरला जाईल जो कॉर्पोरेट मास्टर टेबलमधून घेतला जाईल.
9. अधिकृत फाईल्सवर बँकेकडून प्रक्रिया केल्या जातील म्हणजेच पेमेंट फाईलमध्ये निर्दिष्ट केलेल्या लाभार्थी अकाउंट नंबरच्या आधारे डायरेक्ट क्रेडिटशी संबंधित व्यवहार अखंडपणे अंमलात आणले जातील आणि कॉर्पोरेटने सदर पेमेंट पद्धतींसाठी कटऑफ वेळेपूर्वी वाजवीपणे अधिकृत केल्यास आरटीजीएस/एनईएफटी/आयएमपीएस/कॅश डिलिव्हरी व्यवहार अखंडपणे अंमलात आणले जातील.
10. व्यवस्थेनुसार, ग्राहकांचे चेक/डिमांड ड्राफ्ट/कॉर्पोरेट डीडी संबंधित डाटा एकतर बँकेच्या रिमोट शाखांद्वारे किंवा ग्राहकांद्वारे छापला जाईल. बँकेच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे सदर नेटवर्कच्या कामकाजात काही बिघाड झाल्यास आणि/ब्रेक-डाउन झाल्यास, अशा ब्रेक-डाउन दरम्यान मला/आम्हाला याद्वारे देण्यात आलेले लाभ आणि सुविधा बंद राहतील, अशा परिस्थितीत बँक कोणत्याही प्रकारे मला/आम्हाला कोणत्याही नुकसानीसाठी/भरपाईसाठी आणि/किंवा अशा प्रकारे बंद राहिल्यामुळे उद्भवणाऱ्या इतर कोणत्याही परिणामांसाठी जबाबदार राहणार नाही.

## 27. परिशिष्ट - होस्ट टू होस्ट पेमेंट्स

1. पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूल ही बँकेद्वारे दिली जाणारी एक वेब-आधारित पेमेंट सेवा आहे ज्यामध्ये बँकेचे ग्राहक क्लायंट हे बँकेला सदर ग्राहक क्लायंटने दिलेल्या माहितीच्या आधारे ग्राहक क्लायंटने निश्चित केल्यानुसार ग्राहक क्लायंटच्या बँकेतील अकाउंटमधून विशिष्ट लाभार्थ्यांना निधी पाठवण्याची विनंती करू शकतात.
2. ग्राहक बँकेने करारनिविष्ट केलेल्या अटी व शर्तींवर ॲक्सिस बँकेच्या विविध उत्पादनांमध्ये होस्ट टू होस्ट सेवेसाठी पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूलची सेवा घेऊ इच्छित आहे आणि त्यासाठी त्याने बँकेशी संपर्क साधला आहे. बँकेने फंड ट्रान्सफर, आयएमपीएस, एनईएफटी, आरटीजीएस, वेतन आणि वैधानिक पेमेंट्स अशा सेवा देण्यास सहमती दर्शविली आहे.
3. ग्राहकाच्या अकाउंटमध्ये क्लीअर फंडच्या उपलब्धतेच्या अधीन राहून, ग्राहकांच्या आवश्यकतेनुसार पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूल अंतर्गत चेक प्रिंटिंग, डिमांड ड्राफ्ट प्रिंटिंग, कॉर्पोरेट चेक आणि कॉर्पोरेट डीडी.
4. पेमेंट प्लॅटफॉर्म सॉफ्टवेअर बँकेला फंड ट्रान्सफर, आयएमपीएस, एनईएफटी, आरटीजीएस, चेक प्रिंटिंग, डिमांड ड्राफ्ट प्रिंटिंग, कॉर्पोरेट चेक आणि कॉर्पोरेट डीडी, फाईल्स आणि सॉफ्टवेअरद्वारे ऑफर केलेल्या इतर सेवांवर प्रोसेसिंग करण्यास सक्षम करेल, त्यानंतर ग्राहक इंटरनेटद्वारे फाइल्स अपलोड करेल.

5. अपलोड प्रक्रियेसाठी तपशीलवार प्रक्रिया प्रवाह जो ग्राहकाद्वारे अनुसरण केला जाईल तो खाली नमूद केला आहे. सदर प्रक्रियेतून कोणत्याही विचलनास परवानगी दिली जाणार नाही.

<u>होस्ट टू होस्ट प्रक्रियेसाठी प्रक्रिया प्रवाह:</u>

I. ग्राहक ईआरपी/सॉफ्टवेअर ॲक्सिस बँकसह मान्य केलेल्या फॉरमॅटनुसार पेमेंट व्यवहार तयार करेल.

II. मान्य झालेल्या होस्ट टू होस्ट (H2H) इंटिग्रेशन प्रक्रियेनुसार पेमेंट व्यवहार एन्क्रिप्टेड प्रक्रियेद्वारे ॲक्सिस बँकेला पाठवले जातील.

III. ग्राहकांकडून आवश्यक प्राधिकृततेसाठी वैध पेमेंट विनंत्या ॲक्सिस बँक पोर्टलवर उपलब्ध असतील.

IV. व्यवहाराच्या तपशीलांनुसार अधिकृत पेमेंट व्यवहार बँकेच्या बाजूने निधी हस्तांतरण म्हणून किंवा आरबीआय/एनपीसीआय द्वारे प्रक्रिया केले जातील.

V. व्यवहारांची स्थिती/एमआयएस/अहवाल H2H एकत्रीकरणाद्वारे ग्राहक ईआरपी/सॉफ्टवेअरवर स्वयंचलितपणे प्रदान केला जाईल.

6. ग्राहक याद्वारे बँकला चेक/डीडी प्रिंट करण्यास आणि/किंवा प्रोसेस फ्लो नुसार ग्राहकाद्वारे अपलोड केलेल्या तपशिलावर आधारित आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्सफर व्यवहार अंमलात आणण्यास अधिकृत करतो. ग्राहक अशी हमी देतो की, इंटरनेट किंवा इतर कोणत्याही माहिती तंत्रज्ञान प्रणालीशी संबंधित कोणत्याही विफलतेसाठी किंवा विलंबासाठी तो बँकेला जबाबदार धरणार नाही, परंतु अशी विफलता बँकेची अक्षम्य आणि जाणूनबुजून केलेली हयगय यामुळे झाली नसल्यास.

7. ग्राहकाच्या चेक प्रिंटिंगच्या विनंतीच्या संदर्भात, ग्राहक हे मान्य करतो आणि स्वीकारतो की बँक फक्त त्या विशिष्ट खात्याअंतर्गत बँकेने छापलेल्या इन्स्ट्रूमेंटचा स्वीकार करेल. ग्राहकाने बँकेला त्याचा नमुना दिला असेल आणि तो ग्राहकाने बँकेला दिलेल्या संचालक मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने असेल तर ग्राहकाकडून मिळालेल्या प्रतिरूप स्वाक्षऱ्यावर आधारित लेखांचा बँक स्वीकार करेल अशी पार्टींनी आणि पार्ट्यांमध्ये सहमती झाली आहे. प्रतिरूप स्वाक्षरी वर आधारित इन्स्ट्रूमेंटचा स्वीकार, बँकद्वारे केवळ ग्राहकाच्या जोखमीवर आणि जबाबदारीवर केला जाईल. ग्राहक पुढे सहमत आहे की या कराराअंतर्गत विचारात घेतलेल्या व्यवस्थे बाहेर शाखांमध्ये सादर केलेले सर्व चेक न चुकता परत केले जातील आणि अशा परत केलेल्या इन्स्ट्रूमेंट साठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही. ग्राहक पुढे सहमत आहे की एकदा बँकेने चेक, डीडी, कॉर चेक, कॉर डीडी छापल्यानंतर, ते कुरिअर सेवेद्वारे किंवा पोस्टद्वारे ग्राहकांना हाताने वितरित केले जातील किंवा पाठवले जातील. हे स्पष्टपणे मान्य केले आहे की अशी पाठवणी ग्राहकाच्या स्वतःच्या जोखमीवर आणि जबाबदारीवर असेल आणि या अटी आणि शर्तींच्या उद्देशाने सदर कुरिअर सेवा/पोस्ट ग्राहकाचा एजंट मानली जाईल.

8. ग्राहकाने अशी हमी दिली आहे की, डाटा अधिकृत व्यक्तीद्वारे अपलोड केला जाईल आणि ग्राहक बँकेला या अधिकृततेचा पुरावा देणाऱ्या मंडळाच्या ठरावाची प्रत सादर करेल. बँकेत उघडलेल्या अकाउंटमध्ये अधिकृतकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या देखील अपडेट केल्या जातील.
9. बँकेविरुद्ध या अटी व शर्तीमध्ये कोणतीही उपलक्षित कर्तव्ये किंवा दायित्वे वाचली जाणार नाहीत किंवा वाचल्याचे मानले जाणार नाहीत. वर उल्लेख केल्याप्रमाणे निधी पाठवण्याच्या कर्तव्याच्या व्यतिरिक्त, ग्राहक आणि/किंवा लाभार्थी यांच्यात झालेल्या कोणत्याही कराराच्या, व्यवस्थेच्या किंवा समजुतीच्या तरतुदी बँकेला बंधनकारक राहणार नाहीत.
10. बँकेला उपरोक्त साईटवर प्राप्त झालेल्या विनंत्यांची सत्यता आणि/किंवा वैधता आणि/किंवा अधिकृतता तपासल्याशिवाय पेमेंट प्लॅटफॉर्म मॉड्यूल वरील उपरोक्त विनंत्यांवर कारवाई करण्याचा अधिकार बँकेला असेल आणि अशा विनंत्या ग्राहकाने अधिप्रमाणित, वैध आणि योग्यरित्या अधिकृत मानल्या जातील. ग्राहक याद्वारे सहमत आहे की ग्राहकाने होस्ट टू होस्ट सेवेद्वारे बँकेला दिलेल्या वरील नमूद केलेल्या विनंत्यांशी तो अपरिवर्तनीय आणि बिनशर्त बांधील असेल आणि ग्राहकाने वरील साइटवर पाठवलेल्या अशा कोणत्याही विनंत्यांची सत्यता, वैधता किंवा अधिकृतता यावर विवाद करण्याचा अधिकार ग्राहकाला राहणार नाही.
11. ग्राहकाने अशी हमी दिली आहे की त्याला प्रदान केलेली होस्ट टू होस्ट सेवा यासह वेब सुविधा बँकेने निश्चित केलेल्या विशिष्ट उद्देशासाठी वापरली जाईल.
12. ग्राहकाला रिव्हर्स फीड किंवा अन्य मार्गाने केलेल्या व्यवहारांची माहिती मिळेल. व्यवहाराच्या डाटासह यादीची पुर्नपडताळणी करणे हे ग्राहकाचे कर्तव्य असेल.
13. जर ऑनलाईन पासवर्ड निर्माण आणि रिसेट सुविधा प्राप्त झाली असेल तर हे समजले जाते की पासवर्ड पाठविण्यासाठी बँक दिलेली ही माहिती रजिस्टर करेल. कोणत्याही वापरकर्त्याच्या मोबाईल नंबरमध्ये किंवा ईमेल आयडीमध्ये किंवा टोकनमध्ये कोणताही बदल झाल्यास, अधिकृत स्वाक्षरीकर्त्याने स्वाक्षरी करून, जेव्हा जेव्हा असा बदल होईल तेव्हा बँकेला लेटर हेड वर कळवले जाईल. नोंदणीकृत माहितीमध्ये बदल करण्यासाठी बँकेला उशिरा माहिती दिल्यास किंवा कोणतीही माहिती न दिल्यास ग्राहक बँकेच्या कृतींसाठी बँकेला क्षतिपूर्ती करेल.
14. ग्राहक या व्यवस्थेअंतर्गत प्रदान केलेल्या सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरचे नुकसान, गैरवापर, अनधिकृत प्रवेश आणि चोरीपासून संरक्षण करण्यास सहमत आहे.
15. कोणत्याही प्रकारच्या बदलाच्या स्थितीत, ग्राहक परस्पर मान्य सोयीस्कर वेळेत बँकेला कळवेल.
16. ग्राहक बँकेच्या अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना त्यांच्या आवारात हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर बसविण्यासाठी, बदलण्यासाठी आणि नियतकालिक देखभालीसाठी विना-अट प्रवेश देण्यास सहमत आहे. जेणेकरून बँकेतील आणि ग्राहकाच्या प्रणालींमध्ये परस्पर सोयीस्कर वेळी डाटाची देवाणघेवाण सुलभ होईल.

17. ही सेवा बंद झाल्यास, बँक या व्यवस्थेअंतर्गत ग्राहकांना प्रदान केलेले सर्व हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर परत मागवेल.
18. ही सेवा खंडित झाल्यास, ग्राहक त्याच्या हार्डवेअर सिस्टीममध्ये बँकेने किंवा तिच्या प्रतिनिधींनी वापरलेले सर्व सॉफ्टवेअर तत्काळ आणि कायमचे नष्ट करण्यास आणि या व्यवस्थेअंतर्गत बँकेने प्रदान केलेले सॉफ्टवेअर आणि कागदपत्रे असलेले सर्व माध्यम बँकेला परत करण्यास सहमत आहे.
19. ग्राहक सहमत आहे आणि पुष्टी करतो की, बँक H2H व्यवहारांना पूर्व-मंजूर व्यवहार म्हणून प्रक्रिया करेल म्हणजेच ग्राहकाच्या ईआरपी/ॲप्लिकेशन मधून पेमेंट सुरू झाल्यानंतर, ग्राहकाच्या सूचनांनुसार आणि अशा पूर्व-मंजूर व्यवहारांच्या प्रक्रियेतून सूचना प्राप्त झाल्यानंतर ते 'सरळ-मार्गे' अखंडपणे प्रक्रिया केले जातील, त्यासाठी पुढील परवानगीशिवाय. अशा परिस्थितीत, बँकेने ग्राहकाच्या सूचनांनुसार सद्भावनेने कारवाई केल्यामुळे ग्राहकाला झालेल्या कोणत्याही हानी/नुकसानासाठी ग्राहक बँकेला कोणत्याही प्रकारे जबाबदार धरणार नाही.

## 28. परिशिष्ट- सेवा विनंती

1. **मोबाईल नंबर अपडेट:** खात्याशी संबंधित कोणताही संपर्क तसेच व्यवहार सल्ला पाठविण्यासाठी बँक नोंदीमध्ये मोबाईल नंबर अपडेट केला जाऊ शकतो. बँकेला उचित वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही व्यवहाराची सत्यता पडताळणी, कॉल बॅक किंवा तपासणी करण्यासाठी मी बँकेला अद्ययावत केलेल्या नंबरवर माझ्याशी संपर्क साधण्याची परवानगी देतो. मी पुष्टी करतो की हा मोबाईल नंबर माझ्याकडे आहे आणि कोणत्याही तृतीय पक्षाद्वारे वापरला जात नाही. मी वचन देतो की जर मोबाईल नंबर बदलला तर मी बँकेला योग्यरित्या आणि त्वरित कळवेल.
2. **स्कीम कोड रूपांतरण:** आम्ही निवडलेल्या नवीन स्कीम कोडशी संबंधित वैशिष्ट्ये आणि शुल्क रचना वाचली आणि समजून घेतली आहे आणि ती पुढील शुल्क चक्र (सायकल) पासून लागू होईल. जी पुढील महिन्याच्या 1 तारखेपासून लागू होईल.
3. **ईमेल आयडी अपडेशन:** ईमेल आयडी हा अकाउंट स्तरावर अपडेट केला जाऊ शकतो. बँकेकडून अकाउंट स्टेटमेंट आणि पत्रव्यवहार हा नोंदणीकृत ईमेल आयडी द्वारे केला जाईल. ईमेल आयडीच्या अपडेट आधारावर प्रत्यक्ष स्टेटमेंटचे अपडेट बंद केले जाईल.
4. **चेकबुक विनंती:** मी लागू असल्याप्रमाणे चेकबुक शुल्क भरण्यास सहमत आहे आणि ते माझ्या अकाउंटमधून कपात केले जाईल
5. **चेकचे पेमेंट थांबवा:** एकल चेक थांबविण्यासाठी, चेक निवडा आणि पेमेंट थांबविण्यासाठी चेक नंबर टाईप करा. एका श्रेणीतील अनेक चेक थांबवण्यासाठी, "सिंगल चेक" निवडा आणि तुम्हाला थांबवायची असलेली चेक श्रेणी प्रविष्ट करा. जर तुम्हाला चेक नंबर लक्षात नसेल तर "चेक नंबर

शोधा आणि पेमेंट थांबवा" निवडा. कृपया लक्षात घ्या की एकदा सबमिट केल्यानंतर तुमच्या विनंतीवर त्वरित प्रक्रिया केली जाईल.

**6. जीएसटीआयएन अपडेशन:**

1. मी/आम्ही याद्वारे ॲक्सिस बँक लिमिटेड ("बँक") ला माझी/आमची स्पष्ट संमती प्रदान करतो आणि अधिकृत करतो:
   1. बँकेने नियुक्त केलेल्या सेवा प्रदात्या कर्झा टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड ("कर्झा") सोबत शेअर करण्याच्या उद्देशाने, बँकेने माझा/आमचा पॅन नंबर वापरावा,ॲक्सेस करावा, प्रक्रिया करावी आणि संग्रहित करावा, [कर्झाला माझा जीएसटी-आयएन क्रमांक, जीएसटी-आयएन स्थिती, नोंदणीकृत मोबाइल नंबर, नोंदणीकृत ईमेल आयडी, पत्ता ("जीएसटी-आयएन डेटा") जीएसटी पोर्टलवरून बँक आणि तिच्या गट उपकंपन्यांसह जीएसटी-आयएन डाटा शेअर, ट्रान्सफर आणि प्रकट करण्यासाठी सक्षम करावे] आणि,
   2. बँक आणि तिच्या गट उपकंपन्या [बँक आणि तिच्या गट उप-कंपन्यांचे उत्पादने आणि सेवांचे निरीक्षण, मूल्यांकन आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी, क्रेडिट मूल्यांकन, क्रेडिट ब्युरो तपासणी, क्रेडिट स्कोअरिंग मॉडेल आणि व्यवसाय धोरणे विकसित करण्यासाठी, फसवणूक शोधण्यासाठी आणि मनी लाँडरिंग विरोधी दायित्वांसाठी, आणि क्रेडिट माहिती कंपन्या, माहिती उपयुक्तता, इतर बँका आणि वित्तीय संस्था आणि नियामक अधिकारी, तपास संस्था, न्यायिक, अर्ध-न्यायिक आणि वैधानिक अधिकाऱ्यांना जीएसटी-आयएन डाटा सामायिक करण्यासाठी आणि उघड करण्यासाठी] जीएसटी-आयएन डाटा वापरण्यासाठी, प्रवेश करण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी, संग्रहित करण्यासाठी, पडताळणी करण्यासाठी, प्रोफाइल करण्यासाठी, विश्लेषण करण्यासाठी, शेअर करण्यासाठी, हस्तांतरित करण्यासाठी आणि प्रकट करण्यासाठी].
2. मी/आम्ही कर्झा कडून कोणत्याही प्रकारे जीएसटीआयएन डाटाचे उल्लंघन किंवा गैरवापर झाल्यास बँकेला जबाबदार धरणार नाही आणि मी/आम्ही सहमत आहोत, पुष्टी करतो आणि कबूल करतो की कर्झा कडून माझ्या/आमच्या जीएसटीआयएन डाटाच्या वापराचे ऑडिट, देखरेख, पुनरावलोकन आणि मूल्यांकन करण्यास बँक बांधील नाही.

**7. आयई कोड अपडेशन:**

1. मी/आम्ही याद्वारे ॲक्सिस बँक लिमिटेड ("बँक") ला माझी/आमची स्पष्ट संमती प्रदान करतो आणि अधिकृत करतो:
   (a) बँकेने नियुक्त केलेल्या सेवा प्रदात्या जोकाटा फायनान्शियल ॲडव्हायझरी ॲंड टेक्नॉलॉजी ("जोकाटा") सोबत शेअर करण्याच्या उद्देशाने, माझा/आमचा आयईसी नंबर वापरण्यासाठी, ॲक्सेस करण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी आणि

संग्रहित करण्यासाठी, [जोकाटाला डीजीएफटी पोर्टलवरून माझा आयईसी नंबर, आयईसी स्टेटस परत मिळवण्यासाठी आणि बँक आणि तिच्या गट उपकंपन्यांसह आयईसी डाटा शेअर करण्यासाठी, हस्तांतरित करण्यासाठी आणि प्रकट करण्यासाठी सक्षम करण्यासाठी] आणि,

(b) बँक आणि तिच्या गट उपकंपन्या [बँक आणि तिच्या गट उप कंपन्यांचे उत्पादने आणि सेवांचे निरीक्षण, मूल्यांकन आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी, क्रेडिट मूल्यांकन, क्रेडिट ब्युरो तपासणी, क्रेडिट स्कोअरिंग मॉडेल आणि व्यवसाय धोरणे विकसित करण्यासाठी, फसवणूक शोधण्यासाठी आणि मनी लाँडरिंग विरोधी दायित्वांसाठी, आणि क्रेडिट माहिती कंपन्या, माहिती उपयुक्तता, इतर बँका आणि वित्तीय संस्था आणि नियामक अधिकारी, तपास संस्था, न्यायिक, अर्ध-न्यायिक आणि वैधानिक अधिकाऱ्यांसह आयईसी डाटा सामायिक करण्यासाठी आणि उघड करण्यासाठी] आयईसी डाटा वापरण्यासाठी, प्रवेश करण्यासाठी, प्रक्रिया करण्यासाठी, संग्रहित करण्यासाठी, पडताळणी करण्यासाठी, प्रोफाइल करण्यासाठी, विश्लेषण करण्यासाठी, सामायिक करण्यासाठी, हस्तांतरित करण्यासाठी आणि उघड करण्यासाठी].

2. जोकाटा कडून आयईसी डाटाच्या कोणत्याही प्रकारे उल्लंघन किंवा गैरवापरासाठी मी/आम्ही बँकेला जबाबदार धरणार नाही आणि मी/आम्ही सहमत आहोत, पुष्टी करतो आणि कबूल करतो की जोकाटा कडून माझ्या/आमच्या आयईसी डाटाच्या कोणत्याही प्रकारे वापराचे ऑडिट, देखरेख, पुनरावलोकन आणि मूल्यांकन करण्यास बँक बांधील नाही.

## 8. टीओडी (तात्पुरते ओव्हर ड्राफ्ट)

आम्ही पुष्टी करतो की ओव्हरड्राफ्टची जारी केलेली रक्कम केवळ वरील उद्देशांसाठी वापरली जाईल आणि आर्बिट्रेज, वैयक्तिक व्यापार, प्लेज्ड सिक्युरिटीज/म्युच्युअल फंड/डिबेंचर मध्ये गुंतवणूक करण्यासाठी नाही आणि आम्ही वचन देतो की वरील ओव्हरड्राफ्ट वर नमूद केलेल्या दिवशी नियमित केला जाईल. पुढे, आम्ही बँकेला नुकसानभरपाई देण्याचे वचन देतो आणि पेआउट आणि/किंवा संस्थात्मक व्यवहारांसापेक्ष टीओडीला परवानगी दिल्यामुळे बँकेला होणाऱ्या कोणत्याही हानी/जोखीम/नुकसानापासून ती सुरक्षित ठेवतो. तुमच्या मागणीनुसार, बँकेने वेळोवेळी ठरवलेल्या कमाल कर्ज दराने आणि लागू असेल तेथे थकीत व्याजासह असे नुकसान/जोखीम/नुकसान परतफेड करण्याची जबाबदारी आम्ही घेतो. पेआउट सापेक्ष टीओडीच्या बाबतीत सेटलमेंट खात्यातून किंवा बँकेला टीओडी दायित्व पूर्ण करण्यात कोणतीही कमतरता आढळल्यास बँकेकडे असलेल्या कंपनीच्या कोणत्याही खात्यातून निधी हस्तांतरणासाठी आमची अपरिवर्तनीय परवानगी स्वीकारण्याची आम्ही तुम्हाला विनंती करतो. हस्तांतरण केवळ खातेधारकाच्या

जोखमीवर आणि निष्पत्तीवर केले जाईल. आम्ही वेळोवेळी लागू असलेल्या बँकच्या नियमांचे पालन करू. तुम्ही तुमचे शुल्क, जर काही असेल तर, तुमच्या बँकेत असलेल्या आमच्या नियुक्त खात्यातून वजा करू शकता. आम्हाला समजते की ही सुविधा बँकेने वेळोवेळी आकारलेल्या दराने दिली जाईल.

**29. ॲक्सिस मोबाईल कॉर्पोरेट वर एम-पिनसह लॉग-इन**

**नोंदणी:**

मोबाइल बँकिंग ॲप्लिकेशनच्या नोंदणी प्रक्रियेदरम्यान वापरकर्त्याला एम-पिन सेट करण्यास सांगितले जाईल. वापरकर्त्याला त्याच्या जोखमीवर आणि परिणामांवर शक्य तितक्या वेळा एम-पिन बदलण्यास अनुमती असेल. अशा प्रकारे बदललेल्या एम-पिनची गोपनीयता राखण्याची जबाबदारी संपूर्णपणे वापरकर्ता घेईल. अधिकृत वापरकर्ता व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने एम-पिनचा गैरवापर केल्यास बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

मोबाईल बँकिंग सुविधेचा गैरवापर / अनधिकृत वापरामुळे वापरकर्त्याला झालेल्या नुकसानासह या वतीने बँक कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही.

जर वापरकर्ता एम-पिन विसरला तर मोबाइल बँकिंग ॲप्लिकेशनमध्ये नवीन एम-पिन रिसेट करण्याचे वैशिष्ट्य आहे.

ॲक्सिस बँकेने मोबाईल फोन क्रमांकाच्या पडताळणीद्वारे आणि/किंवा ॲक्सिस बँकेच्या विवेकबुद्धीनुसार निर्धारित केल्याप्रमाणे एम-पिनच्या पडताळणीद्वारे ग्राहकाच्या प्रमाणीकरणाची पद्धत स्वीकारली आहे

अनधिकृत ॲक्सेस आणि/किंवा वर नमूद केलेल्या प्रमाणीकरणाच्या पद्धतींचा वापर ग्राहकाच्या खात्याच्या सुरक्षेला जोखीम निर्माण करू शकतो. म्हणून, पडताळणीच्या पद्धतींच्या वापराशी संबंधित कोणतेही कायदेशीर धोके टाळण्यासाठी, ग्राहकांनी ॲक्सिस बँकेच्या स्व-विवेकानुसार निश्चित केलेले मोबाईल फोन क्रमांक, एम-पिन किंवा पडताळणीच्या अन्य कोणत्याही पद्धती सारख्या प्रमाणीकरण मापदंडांची पूर्ण गोपनीयता, गुप्तता आणि सुरक्षितता जपली पाहिजे.

ॲक्सिस मोबाईल कॉर्पोरेट अंतर्गत ऑफर केलेल्या सेवा - भारतीय नागरिक असलेल्या आणि नोंदणीच्या तारखेला 18 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या वापरकर्त्यांसाठी उपलब्ध असतील. अशा अटींच्या अधीन असेल की तो/ती ॲक्सिस मोबाईल कॉर्पोरेट ॲप्लिकेशन डाउनलोड करतो. यशस्वीरित्या इंस्टॉल करतो आणि त्यानंतर लागू क्रेडेन्शियलसह स्वत:ला प्रमाणित करतो आणि त्याचा एम-पिन सेट करतो

**वापरकर्त्याची दायित्वे आणि जबाबदाऱ्या:**

1. उपरोक्त सेवांच्या वापरासाठी वापरकर्ता त्याच्या मोबाईल फोन आणि एम-पिनचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असेल.

2. वर नमूद केलेल्या कोणत्याही एम-पिन किंवा ॲक्सिस मोबाईल कॉर्पोरेट वर प्रदान केलेल्या क्रेडेन्शियल्सचा कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत किंवा बेकायदेशीर वापरासाठी किंवा दिलेल्या कोणत्याही फसव्या किंवा चुकीच्या सूचना आणि त्यामुळे झालेल्या कोणत्याही आर्थिक शुल्कासाठी वापरकर्ता बँकेला जबाबदार असेल, जे फक्त वापरकर्त्याद्वारेच देय असेल.
3. वापरकर्ता स्वीकारतो की या सेवांच्या उद्देशांसाठी, वैध एम-पिन सह वापरकर्त्याने नोंदणीकृत केलेल्या मोबाइल फोन नंबरवरून होणारे कोणतेही व्यवहार, वापरकर्त्याने त्याच्या विवेकबुद्धीनुसार सुरू केले आहेत असे गृहीत धरले जाईल.

**सेवेच्या इतर अटी:**

1. वापरकर्ता एम-पिन/ओटीपी/कोड/पासवर्डची गोपनीयता राखण्यासाठी आणि अशा एम-पिन/ओटीपी/पासकोड/पासवर्डच्या वापरामुळे किंवा गैरवापरामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिणामांसाठी जबाबदार असेल.
2. ॲक्सिस मोबाईल - कॉर्पोरेट ॲप्लिकेशन मध्ये त्याच्या वतीने केलेल्या कोणत्याही अनधिकृत वापर/प्रवेशाबद्दल किंवा एम-पिन/ओटीपी/पासकोड/पासवर्डचा गैरवापर किंवा सेवांबाबतच्या सुरक्षेच्या इतर कोणत्याही उल्लंघनाबद्दल, ज्याची त्याला माहिती आहे, निष्काळजी कृतींमुळे किंवा ॲक्सिस बँकेला वाजवी वेळेत तात्काळ सूचित करण्यात त्याच्याकडून झालेल्या सर्व नुकसानासाठी वापरकर्ता जबाबदार असेल.
3. वापरकर्ता पुष्टी करतो की, त्याने दिलेल्या कोणत्याही सूचना अशा सेवांचा लाभ घेण्यासाठी त्याने वापरलेल्या वास्तविक एम-पिन/ओटीपी/पासकोड/पासवर्डच्या प्रमाणीकरणानंतरच लागू केल्या जातील

अस्वीकरण: वापरकर्त्याच्या एम-पिन, पासवर्ड, पासकोड, ओटीपी किंवा मोबाईल फोन किंवा मोबाईल फोन क्रमांक वापर करून दिलेल्या कोणत्याही फसव्या, बनावट किंवा चुकीच्या व्यवहार सूचनांसाठी वापरकर्त्याच्या एम-पिन, पासवर्ड, पासकोड, ओटीपी किंवा मोबाईल फोन किंवा मोबाईल फोन क्रमांकाचा अनधिकृत वापर झाल्यास ॲक्सिस बँक कोणत्याही जबाबदारी पासून मुक्त असेल.

**30. एफएक्स अँड मार्केट्स**

अटी व शर्ती

**31. मुदत ठेवी - अटी**

डिजिटल मुदत ठेवी संबंधित तपशीलवार अटींसाठी येथे क्लिक करा

32. **डेबिट कार्ड्स**

अटी व शर्ती